cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र

घटस्थापना
नवरात्रोत्सवानिमित्त सर्व भाविक-भक्तांना हार्दिक शुभेच्छा !

www.epaper.rajyaloktantra.com  नवी दिशा... नवे विचार.....  email:rajyaloktantra75@gmail.com


बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-१६७ | मंगळवार, दि.८ ऑक्टोबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने- ६ | किंमत ३ रूपये

# सोयाबीनची हमी भावाने खरेदी न केल्यास कडक कारवाई

## सरकारसह कृषी विभागाचा व्यापाऱ्यांना कडक इशारा

**पुणे । प्रतिनिधी**

**सोयाबीन पिकाची काढणी सध्या सुरू झाली आहे. त्यामुळे शेतकरी सोयाबीन काढून बाजारात विक्रीसाठी आणत आहेत. मात्र, त्याची हमीभावाने खरेदी केली जात नसल्याच्या शेतकऱ्यांच्या तक्रारी आहेत. यामुळे सरकार, कृषी विभाग आणि उत्पन्न बाजार समितीच्या वतीने सोयाबीन खरेदीदार व्यापाऱ्यांना पत्रे पाठवून केंद्र सरकारच्या हमी भावानुसार खरेदी करण्याच्या सूचना केल्या आहेत.**



हमीभावाने सोयाबीन खरेदी न केल्यास कारवाईचाही इशारा देण्यात आला आहे.

खरीप हंगामातील पावसाच्या पाण्यावर येणारे कमी त्रासाचे पीक म्हणून सोयाबीनकडे पाहिले जाते. यंदा टप्प्याटप्प्याने पाऊस झाल्याने सोयाबीनचे पीक चांगले येऊन दरही वाढल्याने चार पैसे जादाचे मिळतील, अशी आशा शेतकऱ्यांना आहे. मात्र, परतीच्या पावसाने सध्या जोरदार हजेरी लावल्याने हातातोंडाशी आलेले सोयाबीनचे पीक हाताशी लागेल, की नाही याबाबत साशंकता निर्माण झाली आहे. दरम्यान, यंदा केंद्र सरकारने किमान हमीभाव ४ हजार ८९२ रुपये जाहीर केला आहे. शेतकऱ्यांनी सोयाबीन काढून बाजारपेठेत विक्रीसाठी आणले, तर सरकारी हमीभाव केंद्र सुरू नसल्याने त्यांना सोयाबीन घालता येत नाही. त्यामुळे त्यांना नाइलाजाने मिळेल त्या दराने सोयाबीनची विक्री करण्याशिवायच पर्याय राहात नाही. सध्या बाजारपेठेत उतारा बघून साडेतीन ते चार हजार दोनशे रुपयांपर्यंत दर दिला जात असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. याची दखल घेऊन

◀◀ पान २ वर

**शहर कडकडीत बंद; विद्यार्थी,महिलांसह नागरिकांची मोर्चात मोठ्या प्रमाणावर समावेश**

# चिमुकलीवरील अत्याचाराविरोधात माजलगावकर रस्त्यावर!

## नराधम आरोपीस फाशीची शिक्षा देण्याची मागणी





**माजलगाव । प्रतिनिधी**

शहरालगत असलेल्या एका खाजगी विद्यालयातील शिक्षकाने साडेपाच वर्षीय विद्यार्थिनीवर अत्याचार केल्याची घटना शहरात उघडकीस आली असून पोलिसांनी याप्रकरणातील आरोपीस बेड्या ठोकल्या आहेत. फास्ट ट्रॅक कोर्टामार्फत हे प्रकरण चालवून नराधम शिक्षकाला

◀◀ पान २ वर

### संस्था चालकावर गुन्हा नोंदविण्याची मागणी

हा मोर्चा एवढा मोठा होता की, पहिली व्यक्ती तहसील कार्यालयात असताना शेवटची व्यक्ती हनुमान चौकात दिसून आली.एवढ्या मोठ्या प्रमाणात मोर्चा निघण्याची ही माजलगावच्या इतिहासातील पहिलीच वेळ दिसून आली. त्याचबरोबर माजलगाव शहर कडकडीत बंद असल्यामुळे कोठे पाणी देखील मिळणे मुश्किल झाले होते.यावेळी तहसीलदार संतोष रुईकर यांना निवेदन देण्यात आले.यावेळी मोर्चेकर्यांनी ज्या शाळेतील हा शिक्षक आहे त्या शाळेच्या संस्थाचालकांना सह आरोपी करून त्यांच्यावर देखील गुन्हे दाखल करावे अशी मागणी देखील करण्यात आली.

# संधी मिळाल्यास शिंदे शिवसेनेचा बीड जिल्ह्यात पहिला आमदार होणार

## अनिल जगताप विधानसभा लढवण्यासाठी सज्ञ

**बीड । पतिनिधी**

२००९ पासून बीड विधानसभेची तयारी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप यांनी केलेली आहे. त्यांना वारंवार आमदारकीने हुलकावणी दिली आहे. जनतेचे तीव्र इच्छा असून सुद्धा अनिल जगताप यांना आमदारकीच्या माध्यमातून जनसेवा करण्याची संधी मिळाली नाही. मात्र

◀◀ पान २ वर









# हरियाणा, जम्मू-काश्मीर विधानसभेचा आज निकाल

नवी दिल्ली । वृतसंस्था

हरियाणा आणि जम्मू-काश्मीरमध्ये विधानसभेसाठी नुकतेच मतदान पार पडले. हरियाणा राज्यात ५ ऑक्टोबर रोजी विधानसभेच्या ९० जागांसाठी एकाच टप्प्यात मतदान झाले, तर जम्मू-काश्मीरमध्ये

◀◀ पान २ वर

# प.बंगालमध्ये कोळसा खाणीत स्फोट : ६ ठार

**कोलकाता । वृतसंस्था**

पश्चिम बंगालमधील बीरभूम जिल्ह्यातील कोळसा खाणीत सोमवारी (दि.७) भीषण स्फोट झाला. सकाळी १०.३० वाजता भादुलिया ब्लॉकमधील कोळसा खाणीत ही घटना घडली. या स्फोटात सहाजण ठार झाले. स्फोटाचे कारण अद्याप समजू शकलेले नाही. बचाव आणि मदतकार्य सुरू आहे. गंगारामचक गावातील (जि.बीरभूम) खासगी कोळसा खाणीत ब्लास्टिंग सुरू असताना हा अपघात झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. सुरुवातीला स्फोटानंतर खाण कोसळली. त्यामुळे हा अपघात अधिक धोकादायक झाला. या दुर्घटनेत अनेक मजुरांचे मृतदेह छिन्नविछिन्न

◀◀ पान २ वर

## माळ सहावी



षष्ठीचे दिवशीं
भक्तां आनंद वर्तला हो ।।
घेउनि दिवट्या हस्तीं
हर्षे गोंधळ घातला हो ।
कवडी एक अर्पितां
देवी हार मुक्ताफळां हो ।।
जोगवा मागतां प्रसन्न झाली
भक्तकुळा हो ।। ६ ।।
उदो बोला उदो
अंबाबाई माउलीचा हो ।
उदोकारें गर्जती काय
महिमा वर्णू तिचा हो ।।

# श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ देवस्थान वरील माझ्या आणि त्यांच्या विकास कामांचा हिशोबच होऊन जाऊ द्या-माजी राज्यमंत्री सुरेश धस

## मच्छिंद्रनाथ देवस्थान परिसरात २२ कोटी रु.च्या विकास कामांचा शुभारंभ



आष्टी । प्रतिनिधी

नाथ संप्रदायातील अग्रणी असलेले श्री.मच्छिंद्रनाथ देवस्थान हे संपूर्ण भारत देशातील भाविक भक्तांचे श्रद्धास्थान असून या गडाची सेवा करण्यासाठी विश्वस्त मंडळामध्ये पदसिद्ध विधानसभा सदस्य असावा या उदात्त हेतूने आपण काम सुरू केले असून मी केलेली विकास कामे आणि गेल्या दहा वर्षातील माजी आणि आजी आमदारांनी श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ देवस्थान येथे केलेल्या विकास कामांचा एकदा हिशोब होऊन जाऊ द्या असे आव्हान माजी राज्यमंत्री सुरेश धस यांनी यांनी दिले.

श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गड परिसरातील २० कोटी ३५ लक्ष रुपये यांच्या विकास कामाच्या शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष पदी ॲड. साहेबराव मस्के, ह.भ.प.भानुदास महाराज मस्के, ह.भ.प.अशोक महाराज मरकड, घाटशीळ पारगाव येथील सरपंच वैजनाथ खेडकर, सावरगावचे सरपंच पंढरीनाथ चंदनशिव, कार्यकारी अभियंता पान संबळ, उप अभियंता सौदागर, शाखा अभियंता बादाडे, कानिफनाथ गडाचे

◀◀ पान २ वर







## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,
बीड,दि.०५ ऑक्टोबर २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २.०० क्विंटल | २,६३६ | ३,२५० | २,९७८ |
| ज्वारी/हायब्रिड :६४.०० क्विंटल | २,०५० | २,४०१ | २,२१० |
| मूग : २.५० क्विंटल | ६,४०० | ६,८५१ | ६,६२५ |
| तूर :१.०० क्विंटल | ७,००० | ८,९३० | ७,९६५ |
| उडीद : ३३.५० क्विंटल | ६,५०१ | ७,६०० | ७,०६७ |
| बाजरी : ८.०० क्विंटल | २,२६४ | २,६६१ | २,४६१ |
| मुग : ११.०० क्विंटल | ६,७०० | ७,३०० | ६,९६३ |
| सोयाबीन: ६६८.०० क्विंटल | ३,१०१ | ४,३२० | ३,८०१ |
| हरभरा: ५.०० क्विंटल | ७,५०० | ७,५०० | ७,५०० |

# डॉ.योगेश क्षीरसागरांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत शेकडो युवकांच्या हाती 'घड्याळ'

## ना.अजितदादा, धनुभाऊंच्या नेतृत्वामुळे युवकांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे ओढा



**बीड । प्रतिनिधी**

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी पक्ष प्रवेश केल्यापासून पायाला भिंगरी बांधून मतदारसंघ पिंजून काढला आहे. त्यांचा जनसंपर्क, प्रभावी कार्यपद्धती पाहून विविध पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते त्यांना साथ देण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार, पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करत आहेत.**

बीड तालुक्यातील अंजनवती येथे दौऱ्यावर असताना डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या उपस्थितीत ग्रामपंचायत सदस्य सूर्यभान कार्डिले यांनी पक्षात प्रवेश केला.

◀◀ पान २ वर







cmyk

अग्रलेख

# जातीवादावर न्यायालयाकडून ओरखडे मात्र समाजात उदासिणता

सर्वोच्च न्यायालयाच्या ताज्या निर्णयाने देशातील तुरुंगात आजही जो अत्यंत हीन पातळीवरचा जातिभेद सुरू होता त्यावर अत्यंत कठोर प्रहार केला आहे. समाजात सुधारणा घडविण्यासाठी कायदेमंडळाऐवजी न्यायव्यवस्थेला पुढाकार घ्यावा लागतो हे दुर्दैवच! मात्र, न्यायव्यवस्थेने तशी सबब पुढे न करता हा ऐतिहासिक व सुधारणावादी निर्णय दिला त्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड, न्या. मनोज मिश्रा आणि न्या. जे. बी. पारडीवाला यांच्या पीठाचे करावे तेवढे अभिनंदन कमीच आहे! सर्वोच्च न्यायालयाच्या या पीठाने मागच्या गुरुवारी देशातील बहुतेक राज्यांच्या तुरुंग नियमावल्या बरखास्त केल्या आणि कैद्यांना तुरुंगात दाखल करून घेताना त्यांच्या जातीची नोंद केली जाऊ नये, असा अत्यंत महत्त्वपूर्ण आदेश दिला.

सर्वोच्च न्यायालयास हा आदेश द्यावा लागला कारण केंद्र सरकारने २०२२ मध्ये तुरुंग प्रशासनाची आदर्श नियमावली जारी केली असली तरी त्याची बहुतांश राज्यांनी अद्याप अंमलबजावणी करणे तर सोडाच पण या नियमावलीकडे ढुंकून पाहण्याचे कष्टही घेतलेले नाहीत. यामुळे तुरुंगात कैद्यांना त्यांच्या कर्मानुसार नव्हे तर जातीनुसार कामांची विभागणी करण्याची पद्धत आजही कायमच होती. २०१६ पासून देशभरातील तुरुंग आणि राज्यांच्या त्याबाबत असलेल्या नियमावल्या यांचा अभ्यास करणाऱ्या पत्रकार, समाज अभ्यासक, लेखिका सुकन्या शांता यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केल्याने स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानंतरही देशातील बहुतांश राज्यांतील तुरुंगात सुरू असलेल्या जातिभेदाचा भांडाफोड झाला. बहुतांश राज्यांच्या तुरुंगात कैद्यांना समान वागणूक देण्याच्या आदर्श नियमावलीस अडगळीत टाकून कैद्यांना त्यांच्या जातीप्रमाणे कामाचे वाटप करण्याचीच प्रथा सर्रास पाळली जात असल्याचे स्पष्ट झाले. म्हणजे एखादा कैदी कितीही गंभीर गुन्ह्यासाठी शिक्षा भोगत असला तरी तो उच्चवर्णीय असेल तर त्याला स्वच्छतागृह साफ करण्याची कामे दिली जात नाहीत आणि कितीही किरकोळ गुन्ह्यासाठी शिक्षा भोगणाऱ्या कनिष्ठ वर्णीय कैद्यास स्वयंपाकाचे काम दिले जात नाही, त्याला स्वच्छतेचीच कामे करावी लागतात. २०२२ मध्ये केंद्राने तुरुंग प्रशासनासाठी संपूर्ण देशासाठीची आदर्श नियमावली तयार करताना तुरुंगातील हा जातिभेद मिटवण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. या आदर्श नियमातील कैद्याची जात पाहून त्याला कामे दिली जाऊ नयेत वा त्यांच्या जातीनुसार तुरुंगात त्यांचे वर्गीकरण केले जाऊ नये यासाठीच्या अनेक तरतुदी करण्यात आल्या आहेत. कैद्यांचे वर्गीकरण कच्चे कैदी, नैमित्तिक कैदी, राजबंदी वा दिवाणी कैदी आणि सराईत गुन्हेगार असेच केले जावे, असे या नियमावलीत स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे. मात्र, तुरुंग प्रशासन हा राज्यांच्या अखत्यारीतला विषय असल्याने राज्यांनी केंद्राच्या या आदर्श नियमावलीनुसार राज्याच्या नियमांमध्ये बदल वा सुधारणा करायला हव्यात. मात्र, बहुतांश राज्यांनी केंद्राच्या या आदर्श नियमावलीस एक तर केराची टोपली दाखविली किंवा या आदर्श नियमावलीच्या नियमांना बगल देणाऱ्या तरतुदी तुरुंग प्रशासन नियमावलीत घुसडल्या. या पार्श्वभूमीवर जातिभेद मिटवण्याच्या सुधारणेसाठी सर्वोच्च न्यायालयानेच पुढाकार घेऊन ऐतिहासिक निकाल दिला त्याचे स्वागतच. या निर्णयामुळे यापुढे तुरुंगात जातीवरून भेदाभेदाची पद्धत संपुष्टात येईल. मात्र, हा सुधारणेचा एकच टप्पा झाला. तुरुंगाच्या बाहेर समाजात जो जातिभेद घट्ट रुतून बसला आहे व हल्ली तर तो आणखी अणकुचीदार बनतो आहे तो कसा दूर होणार? त्यासाठी कोण पुढाकार घेणार हा खरा प्रश्न. अशा सुधारणांसाठी ज्यांनी पुढाकार घ्यावा असे अपेक्षित आहे ते जनतेचे लोकप्रतिनिधीच आज आपली जात व या जातीची व्होट बँक अत्यंत उजळ माथ्याने मिरवीत असल्याचे दिसतात. त्यात ना त्यांना काही गैर वाटते ना त्यांच्या समर्थकांना. याच लोकप्रतिनिधींनी समाजात न्याय व समता आणण्याच्या, पुरोगामीत्वाच्या लंब्याचौड्या गप्पा मागची कित्येत वर्षे झोडल्या पण प्रत्यक्षात मतपेटीच्या राजकारणासाठी जातीच्या जाणीवा जास्त टोकदार करण्यालाच प्रोत्साहन दिले. त्याचा परिणाम आज समाजाची वीण उसवत असताना दिसतो आहेच. घटनाकार बाबासाहेब आंबेडकर यांनी घटनासभेत केलेल्या भाषणात ज्या चिंता व्यक्त केल्या होत्या त्या आजही तंतोतंत खऱ्या ठरताना पहायला मिळते आहे. हा एकप्रकारे आपण स्वीकारलेल्या लोकशाही व्यवस्थेचा व विज्ञानवादी दृष्टिकोनाचा पराभवच मानायला हवा. दलित नवरदेव घोड्यावर बसला म्हणून हत्या, सवर्णांच्या माठातील पाणी पिले म्हणून मारहाण, परजातीत लग्न केले म्हणून ऑनर किलिंग, नग्न करून धिंड काढण्याचे प्रकार अशा एक ना कित्येक घटना समाजात दिवसेंदिवस घडत आहेत. आता तर बलात्काराच्या प्रकरणातही अत्याचार झालेल्या मुलीची व तिच्यावर अत्याचार करणाऱ्या नराधमाचीही जात शोधण्याचे प्रकार पहायला मिळत आहेत. विशेष म्हणजे रोज अशा घटना घडत असताना व त्या वाचत–ऐकत असताना समाजमनाला कुठल्याही प्रकाराची खंत वा खेद वाटत नाही, हे पाहता जात आपल्या मनात, विचारात, जीवनात व आचरणात कशी घट्ट रुतून बसली आहे याचा प्रत्यक्ष प्रत्ययच येतो. त्यातून आपल्या समाजमनातून 'जाता जाईना जात' असेच चित्र पदोपदी पहायला मिळते. विशेष म्हणजे हे चित्र बदलण्यासाठी सध्या कुठल्याच पातळीवरून अल्पसेही प्रयत्न होताना दिसत नाहीत, हे समाज म्हणून आपले दुर्दैवच.

# शिवसेना खा. डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या संवाद मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित रहा–अर्जुनराव खोतकर

जालना । प्रतिनिधी

शिवसेना नेते खासदार डॉ. श्रीकांतजी शिंदे हे आज ८ ऑक्टोबर रोजी जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून ते जिल्ह्यातील शिवसेना, युवा सेना, महिला आघाडी ,शेतकरी सेना, व शिवसेनेच्या सर्व अंगीकृतर संघटनेच्या पदाधिकारी कार्यकर्ते गटप्रमुख प्रमुख बुथ प्रमुख यांच्याशी संवाद साधणार आहेत. त्यानिमित्ताने ८ ऑक्टोबर २०२४ रोजी त्यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये मामा चौक जालना येथे सकाळी १०.०० वाजता संवाद मिळाव्याचे आयोजन केलेले आहे मा. डॉ. खा.श्रीकांत शिंदे हे प्रथम जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणारा आहेत त्यामुळे शिवसेनेच्या वतीने त्यांचे भव्य असे स्वागत करणे आपले आद्यकर्तव्य असून त्यामुळे आपण आपल्या भागातील कार्यकर्ते ,शिवसैनिक ,युवा सैनिक ,शेतकरी बांधव, महिला भगिनींनी या संवाद मिळाव्यास व स्वागत सोहळ्यास मोठ्या संख्येने वाजत गाजत मिरवणूकीणे येऊन मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन शिवसेना उपनेते तथा माजी राज्यमंत्री अर्जुनरावजी खोतकर यांनी उपस्थित जालना विधानसभा मतदारसंघातील प्रमुख कार्यकर्त्यांच्या बैठकीत दरम्यान मार्गदर्शन करताना सांगितले.



आज भाग्यनगर येथील दर्शना बंगल्यावर संवाद मिळाव्याच्या पूर्वतयारी संदर्भात प्रमुख शिवसेना कार्यकर्त्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती याप्रसंगी युवासेनेचे सचिव अभिमन्यू खोतकर,शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे ,शहर प्रमुख विष्णू भाऊ पाचफुले ,आत्मानंद भक्त ,युवा सेना जिल्हाप्रमुख अमोल ठाकूर, शैलेश घुमारे ,महिला आघाडी जिल्हा प्रमुख कालींदाताई ढगे ,महिला आघाडीच्या ज्येष्ठ नेत्या सविता केवंडे, उपजिल्हाप्रमुख संतोष मोहिते, गणेश सुपारकर ,उपसरपमुख लक्षण आप्पा अवघड ,युवा सेनेचे योगेश रत्नपारखे, दीपक वैद्य, अल्पसंख्यांक सेलचे जाफरखान ,नजीरभाई, तालुकाप्रमुख भगवानराव अंभोरे, राहुल गवारे, किशोर पांगारकर, गोपी गोगडे ,संतोष जांगडे ,राजू माधवाले ,दिनेश भगत, निखिल पगारे, संजय डुक,रे कांता रांजणकर, मनोज लाखोले, शिवसिंग तिलवारवाले ,संतोष शिकारे ,दीपक राठोड, शिवाजी शेळके, संदीप वाघ, सखाराम लंके, निवृत्ती कुलकर्णी,मुसा परसुवाले, सतीश गायकवाड ,लक्ष्मीबाई भुताडा, उज्वला ताई फोपलीया एडवोकेट आसपाक पठाण, बबनराव मगरे, शुभम टेकाळे, विजय जाधव ,मेघराज चौधरी, लक्ष्मण आप्पा सुतारकर, नागेश ढवळे ,राधाबाई वाडेकर, दुर्गाताई देशमुख ,सविता भोसले, आशा पवार, आशा कोळी, वंदना शहाणे ,विमल शिंदे, कृष्णा दादा डोंगरे, संदीप साबळे, रवी जाधव ,सागर पाटील, महिंद्र मनसेवार ,सौरभ भिसे, भूषण बनकर, अरुण काकडे ,दीपक हवाले, लखन,कणसे, शाहबाज खान, आकाश जगताप ,माधव जाधव ,माधव गायकवाड ,सखाराम इंगळे ,उत्कर्ष जोशी ,विशाल जगधने, चंद्रशेखर निर्मल ,फिटर खंदारे, भोला कांबळे,सुशिल भावसार ,नेल्सन कांबळे जवान हातागळे, राजू गायकवाड, राजू पवार, अंकुश गायकवाड ,किशोर शिंदे ,घोडे पाटील, लक्ष्मण चव्हाण, सखाराम इंगळे, अंकुश शितोळे ,भरत पिंपळे ,हसराज बटावले ,निरज मंत्री, कृष्णा पांडव, सुनील साळवे, सुनील रत्नपारखे,बाहेर खान , भागवत गिराम, कुणाल जाधव,ज्ञानेश्वर लाकडे ,संदीप घारे तुकाराम लकडे ,नरसिंग गोरे ,आदी मान्यवर उपस्थित होते.

## असंख्य काँग्रेस कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश

या कार्यक्रमांमध्ये असंख्य काँग्रेस कार्यकर्त्यांनी शिवसेना उपनेते तथा माजी राज्यमंत्री अर्जुनरावजी खोतकर व युवा सेना सचिव अभिमन्यू खोतकर भाऊसाहेब घुगे शहर प्रमुख पाचफुले यांच्या उपस्थितीमध्ये शिवसेनेत जाहीर प्रवेश केला यामध्ये कुंबेफळ शिंदखेड येथील ग्रामपंचायतचे उपसरपंच भगवानराव खरात, कृष्णा खरात, व त्यांचे सहकारी कुलकर्णी निवृत्तीराव, बबन खरात ,तसेच श्रीकृष्णनगर येथील भरतराव इंगळे ग्रामपंचायत सदस्य ,ज्ञानेश्वर लष्कर काँग्रेस कार्यकर्ते, दहिफळे येथील काँग्रेसचे माजी तालुका संघटक तथा ग्रामपंचायत सदस्य अशोक भानुदास राऊत, साळेगाव नेर येथील गुलाब चव्हाण आदी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी प्रवेश केला या सर्वांचे अर्जुनराव खोतकर यांनी शिवसेना पक्षात शाल व भगवा रुमाल पुष्पहार घालून स्वागत केले व त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी युवासेना सचिव अभिमन्यू खोतकर ,जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, महिला आघाडी जिल्हाप्रमुख कालींदाताई ढगे शहर प्रमुख विष्णू पाच फुले यांनी देखील मार्गदर्शन केले.

# शक्तीप्रदर्शनासह आ.कैलास गोरंट्याल यांचा उमेदवारीसाठी दावा

जालना । प्रतिनिधी

**आगामी विधानसभा निवडणुकीत जालना विधानसभा मतदार संघातून काँग्रेस पक्षाकडून उमेदवारी मिळावी यासाठी आ. कैलास गोरंट्याल यांनी मोठे शक्तीप्रदर्शन करत पक्षाच्या निरीक्षक खा. डॉ. शोभाताई बच्छाव यांच्याकडे आज दावा केला. यावेळी उपस्थित समर्थक, कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांनी गोरंट्याल यांच्या समर्थनार्थ जोरदार घोषणाबाजी केली.**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस पक्षाच्या वतीने जालना जिल्ह्यातील पाचही विधानसभा मतदार संघातून काँग्रेस पक्षाकडून निवडणूक लढविण्यासाठी इच्छूक असलेल्या उमेदवारांच्या मुलाखती आज सोमवारी पाठक मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आल्या होत्या. यावेळी पक्ष निरीक्षक खा. डॉ. शोभाताई बच्छाव यांच्यासह खा. डॉ. कल्याण काळे, प्रदेश उपाध्यक्ष आ. कैलास गोरंट्याल, आ. राजेश राठोड, जिल्हा काँग्रेस अध्यक्ष राजाभाऊ देशमुख, माजी आ. सुरेशकुमार जेथलिया, युवा नेते अक्षय गोरंट्याल, अन्वर देशमुख, शहर जिल्हाध्यक्ष शेख महेमूद, जिल्हा कार्याध्यक्ष राजेंद्र राख, कल्याणराव बोराडे, विजय चौधरी, अविनाश



चव्हाण आदींची व्यासपीठावर उपस्थिती होती. यावेळी आ. कैलास गोरंट्याल यांचे समर्थक वाजेद खान, महावीर ढक्का , आरेफ खान, जगदीश भरतीया, रऊफ परसुवाले, अनिल पाखरे आदींनी आ. कैलास गोरंट्याल हे सर्व समाजाला सोबत घेऊन चालणारे असून, त्यांच्या कार्यपद्धतीचा आढावा पक्ष निरीक्षकांसमोर मांडला. तसेच पक्षाशी एकनिष्ठ नसलेल्या आणि पक्षासाठी कोणतेही योगदान न देणाऱ्या व्यक्तींचा उमेदवारीसाठी विचार न करता, आ. गोरंट्याल यांनाच उमेदवारी द्यावी, अशी मागणी करत त्यांना मोठ्या मताधिक्क्याने विजयी करण्याची ग्वाही पक्ष निरीक्षकांना दिली. आ. गोरंट्याल म्हणाले की, लोकसभा निवडणुकीत पक्षाचे उमेदवार डॉ. कल्याण काळे यांना विजयी करण्यासाठी पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. त्यामुळे काळे हे मोठ्या मताधिक्क्याने निवडून आले. विधानसभा मतदार संघातील उमेदवारीसाठी काहीजण हवा देण्याचे काम करत आहेत. मात्र, हवेची दिशा केव्हा बदलेल याची खात्री नसते, असा टोला आ. गोरंट्याल यांनी लगावला. जे कुणी उमेदवारीसाठी दावे करत आहेत. ते आम्ही वाढवलेले बगलबच्चे असून, त्यांना जनतेतून नगर पालिकेत जाता आले नाही, अशांना आम्ही मागच्या दाराने पाठवले. पक्षाशी एकनिष्ठ असणाऱ्या इच्छूक उमेदवारांचा विचार करावा, अशी अपेक्षा व्यक्त करुन जालना विधानसभा मतदार संघातून आपण इच्छूक असल्याचा दावा त्यांनी पक्ष निरीक्षकांसमोर केला. यावेळी जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख यांचेही भाषण झाले. प्रारंभी पक्षनिरीक्षक खा. डॉ. शोभाताई बच्छाव यांचा जिल्हाध्यक्ष देशमुख, खा. डॉ. काळे, आ. गोरंट्याल, आ. राजेश राठोड, शेख महेमूद, राजेंद्र राख यांनी सत्कार केला. त्यानंतर मंगल कार्यालयातील एका बंद खोलीत मतदार संघनिहाय इच्छूक उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या.

# मनोज जरांगे पाटील यांच्या प्रकृतीची डॉ.अंजली घाडगे यांनी केली विचारपूस

अंबाजोगाई । प्रतिनिधी

सामाजिक कार्यकर्त्या डॉ.अंजलीताई घाडगे यांनी अंतरवाली सराटी येथे जाऊन मराठा आरक्षण आंदोलनाचे संघर्षयोध्दा मनोजदादा जरांगे पाटील यांची भेट घेऊन त्यांच्या प्रकृतीची आस्थेवाईकपणे विचारपूस केली.

मराठा आरक्षणासाठी व्यापक लढा उभा करणारे संघर्ष योध्दा मनोजदादा जरांगे पाटील यांची अंतरवाली सराटी येथील त्यांच्या निवासस्थानी जाऊन सामाजिक कार्यकर्त्या डॉ.अंजलीताई घाडगे यांनी भेट घेतली आणि त्यांच्या प्रकृती विषयी आस्थेने चौकशी केली. या भेटीत डॉ.अंजलीताई यांनी जरांगे पाटील यांना दादा तुम्ही स्वतःच्या तब्येतीची काळजी घ्यावी, योग्य औषधोपचार घ्यावेत अशी विनंती केली. याप्रसंगी डॉ.अंजलीताई यांच्यासोबत त्यांचे अनेक सहकारी उपस्थित होते.



## पान १वरून...

पान १वरून...

### सोयाबीनची हमी भावाने खरेदी

सोयाबीन खरेदीदार शेतकऱ्यांना केंद्र सरकारच्या हमी भावानुसार खरेदी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. हमीभावाने सोयाबीन खरेदी न केल्यास कारवाईचाही इशारा न देण्यात आला आहे.

-------------

### संधी मिळाल्यास शिंदे शिवसेनेचा

यावेळी अनिल जगताप यांच्यासाठी वातावरण अनुकूल असून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार श्रीकांत शिंदे यांनी संधी दिल्यास बीड जिल्ह्यातील शिंदे शिवसेनेचा पहिला आमदार होण्याचा बहुमान अनिल जगताप यांना मिळू शकतो. त्यासाठी बीडची उमेदवारी सर्वात महत्त्वाची आहे आणि ती मिळवून देण्यासाठी शिंदे पिता पुत्रांनी प्रयत्न करण्याची गरज आहे. शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप हे खऱ्या अर्थाने सर्वसामान्यांचे नेतृत्व आहे. कोणत्याही क्षणी फोन केल्यावर अनिल जगताप हे फोन उचलून अडचणीला धावून येतात. बीड विधानसभा मतदारसंघांमध्ये शहरापासून गावापर्यंत आणि कुटुंबातील प्रत्येक सदस्यापर्यंत पोहोचलेले आहेत. २००९ मध्ये खऱ्या अर्थाने बीड विधानसभा मतदारसंघांमध्ये शिवसेनेचे आमदार अनिल जगताप होऊ शकले असते. मतदारसंघातील राजकीय परिस्थिती त्यांच्यासाठी अनुकूल होती, मात्र ऐनवेळी त्यांना उमेदवारी देण्यात आली नाही. शिवसेनेच्या उमेदवाराचा पराभव झाला आणि जयदत्त क्षीरसागर हे बीडचे आमदार झाले.. त्यानंतर २०१४ आणि २०१९ साली झालेल्या विधानसभा निवडणुकीत सुद्धा अनिल जगताप यांना आमदारकीने वारंवार हुलकावणी दिली आहे. यावेळी अनिल जगताप यांनी आपल्या आयुष्यातील ही शेवटची निवडणूक असल्याचे जाहीर केल्याने खऱ्या अर्थाने विधानसभा मतदारसंघातील जनता आज त्यांच्या सोबत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे बीड विधानसभा मतदारसंघ हा महायुती मधून शिंदे शिवसेनेने आपल्याकडे घेण्याची गरज आहे. अनिल जगताप यांना महायुतीची उमेदवारी मिळाली तर विरोधी उमेदवाराचा टिकाव त्यांच्यापुढे लागणार नाही, अशी सध्या जोरदार चर्चा आहे. मराठा आंदोलन मनोज जरांगे पाटील यांचाही आशीर्वाद अनिल जगताप यांना असल्याने मराठा समाज पूर्ण ताकतीने आज त्यांच्या पाठीशी असल्याचे दिसत आहे. अनिल जगताप यांना बीड विधानसभेची उमेदवारी मिळाली तर बीड जिल्ह्यामधून शिंदे शिवसेनेचा पहिला आमदार होण्याचा बहुमान अनिल जगताप यांना मिळू शकतो. त्यासाठी ही जागा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार श्रीकांत शिंदे यांनी आपल्या पक्षासाठी घेण्याची खरी गरज आहे. त्यानंतरचे काम हे अनिल जगताप यांचे राहणार आहे. आणि ते पूर्णतः यशस्वीरित्या पार पाडून बीडमधून आमदार होण्याचा बहुमान मिळू शकतात अशी जोरदार चर्चा आहे.

----------

### प.बंगालमध्ये कोळसा

अवस्थेत सापडले आहेत. पश्चिम बंगाल सरकारने या दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबांना नोकरी देण्याची घोषणा केली आहे. तसेच स्फोटामागील कारणाचा तपास फॉरेन्सिक टीम करणार आहे.

--------

### हरियाणा, जम्मू–काश्मीर

३ टप्प्यात झाले. यानंतर आता या दोन्ही निवडणुकीचे निकाल ८ ऑक्टोबरला लागणार आहे. या निकालासाठी मतमोजणी सकाळी ८ वाजता सुरु होणार आहे. दरम्यान, हरियाणा आणि जम्मू–काश्मीरमध्ये विधानसभा निवडणूक अतिशय चुरशीची झाल्याचे पाहायला मिळाले. त्यामुळे आता या निवडणुकीच्या निकालाकडे देशाचे लक्ष लागलेले आहे. जम्मू–काश्मीरमध्ये कलम ३७० हटविल्यानंतर पहिल्यांदाच निवडणूक झाल्यामुळे या निवडणुकीला महत्व प्राप्त झाले आहे.

-------

### चिमुकलीवरील अत्याचाराविरोधात

तात्काळ फाशीची शिक्षा द्यावी,अशी मागणी करत संतप्त माजलगावकर दि ०७ ऑक्टोबर सोमवार रोजी सकाळी ११:०० वाजण्याच्या सुमारास रस्त्यावर उतरले.माजलगाव शहर कडकडीत बंद ठेवून जुन्या शहरातील हनुमान चौक – डॉ बाबासाहेब आंबेडकर –शहर पोलीस ठाणे मार्ग – छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे–तहसील कार्यालया पर्यंत निघालेल्या भव्य मोर्चात नागरिकांसह, विद्यार्थी व महिलांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग घेतला होता. शहराला लागून असलेल्या एका खाजगी विद्यालयात साडेपाच वर्षीय विद्यार्थिनीवर अत्याचाराची घटना उघडकीस आली आहे.पीडित मुलीने ओळखल्यानंतर याच शाळेतील शिक्षक राहुल अंबादास वायखिंडे यास दि ०५ ऑक्टोबर शुक्रवार रोजी रात्री उशिरा पोलिसांनी ताब्यात घेतले.त्यानंतर न्यायालयाने आरोपीस चार दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती.या प्रकरणाणामुळे माजलगावकरांमध्ये मोठ्या प्रमाणावर संताप आहे.यामुळे हे प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालवून आरोपीस फाशीची शिक्षा देण्यात यावी.या मागणीसाठी दि ०७ ऑक्टोबर सोमवार रोजी माजलगाव बंदची हाक देण्यात आली होती.दि ०७ ऑक्टोबर सोमवार रोजी सकाळ पासूनच शहरातील व्यापाऱ्यांनी सर्व व्यवहार बंद ठेवून या बंदमध्ये सहभाग नोंदवला.दरम्यान, जुन्या शहरातील हनुमान चौकातून निघालेला मोर्चा डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक – शहर पोलीस ठाणे – छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे तहसील कार्यालयावर नागरिकांनी भव्य मोर्चा काढला.तहसीलदारांना विविध मागण्याचे निवेदन यावेळी विद्यार्थ्यांच्या हाताने देण्यात आले.मोर्चात शहरातील अनेक शाळेमधील विद्यार्थी सहभागी झाले होते. त्याचबरोबर विविध सामाजिक संघटना, व्यापारी, सर्वपक्षीय पदाधिकारी यांनी सहभाग नोंदवला. मोर्चात महिलांचा सहभाग लक्षणीय होता.

-------------

### श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ देवस्थान

विश्वस्त ताठे पाटील, देवस्थानचे अध्यक्ष चितळे सर, सचिव बाबासाहेब मस्के, पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रवीण पोकळे ज्येष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे आज मराठी वृत्तवाहिनीचे संपादक अविशांत कुमकर गणेश दळवी शरद रेडेकर सचिन रानडे इत्यादी उपस्थित होते. श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ देवस्थान हे संपूर्ण भारतभरातील भक्तांचे श्रद्धास्थान असून भाविकांची या ठिकाणी गैरसोय असल्यामुळे. विकासकामांची आवश्यकता असताना आपण या गडाचे विश्वस्त म्हणून काम सुरू केले असून आता हे देवस्थान देशपातळीवरील सर्व संविधांयुक्त पर्यटन स्थळ म्हणून विकसित करण्याचा आपला संकल्प असून विश्वस्त मंडळाच्या वतीने या ठिकाणी अनेक विकास कामे सुरू असून त्यातील मच्छिंद्रनाथ गड ते शेंडगेवाडी रस्ता ४.०० कोटी रु., मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतून सावरगाव ते मच्छिंद्रनाथ गड रस्ता ४.०० कोटी रु.चा अत्यंत दर्जेदार विस्तीर्ण असा रस्ता १.७५ कोटी रू.चा मच्छिंद्रनाथ गड ते पत्र्याचा तांडा सरहद्द पर्यंत रस्ता ३.३० कोटी रू. प्रसादालय इमारत बांधकाम २.०० कोटी रु. शौचालयासाठी.७५ कोटी रु. वाहनतळ अद्ययावत करणे २.०० कोटी रु. भक्तनिवास स्वच्छतागृह संरक्षण भिंत ५.००कोटी रु. परिसरातील पाण्याचा तलाव सुधारणा करणे १.०० कोटी रु. अशा एकूण २० कोटी ३५ लाख रु. किमतीच्या विकास कामांचा या कामांचा आज शुभारंभ होत असून आपण सतत वंचित घटकाकडे लक्ष देत असल्यामुळे वेलतुरी हे गाव डोंगरी विकास क्षेत्रात येत असून देखील त्या ठिकाणी विकासाचा निधी कुठे गेला ? असा सवाल करून आता आपण वेलतुरी ते वृद्धेश्वर हा केंद्रीय रस्ते विकास निधीतून २० कोटी रुपये मंजूर करून घेतले असून त्यातून ७.५० मीटर एवढा रुंद अत्यंत दर्जेदार असा रस्ता होणार असल्यामुळे या ठिकाणची रहदारी सुरळीत होणार आहे क्षेत्र मच्छिंद्रनाथ गडाचा मी विधानसभा सदस्य या नात्याने विश्वस्त कधी आलो मात्र वीस १४ मध्ये आपला पराभव झाला त्यानंतर २०१४ ते २०१९ आणि २०१९ ते २०२४ या कालावधीमध्ये विधानसभा सदस्य असलेल्या दोन्ही आमदारांनी केवळ एक एक बैठकीला हजेरी लावली आहे यावरून त्यांना देवस्थानाच्या विकासाविषयी किती गांभीर आहे हे लक्षात येते माझ्या काळात केलेल्या विकास कामांची आणि गेल्या दहा वर्षातील विकास कामांची एकदा तुलना होऊन जाऊ द्या असे सांगत त्यांनी तुलनात्मक चर्चा व्हावी असे आव्हान दिले सध्या काम कमी आणि बोर्ड जास्त दिसतात आपण कामे मंजूर करतो परंतु शुभारंभाच्या नारळ फोडण्याचा नाद आपल्याला कधीच नव्हता सुरुवातीला देवस्थानगडाच्या मालकीची १९ गुंठे एवढी जमीन असताना आज १२५ एकर जमीन देवस्थानच्या मालकीची विकत घेण्यात आहे त्यातून अत्यंत अद्ययावत देशपातळीवर चर्चा होते असे अत्याधुनिक पर्यटन स्थळ विकसित करण्यात येणार आहे असे सांगत ते पुढे म्हणाले की मच्छिंद्रनाथ देवस्थान परिसरामध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोग सारख्या स्पर्धात्मक परीक्षेसाठी अद्ययावत अभ्यासिका बांधकाम करण्यात येणार असून त्याचे त्यासाठी २.०० कोटी रुपये खर्च करण्यात येणार असून विद्यार्थ्यांना आता नगर पुणे मुंबई या ठिकाणी असलेल्या सुविधा उपलब्ध होणार आहेत ग्रामीण भागात भागातील अभ्यासू आणि हुशार विद्यार्थ्यांना ही मोठी संधी निर्माण होणार आहे असे त्यांनी सांगितले संपूर्ण भारत देशातील भाविक भक्त या ठिकाणी येत असतात त्यासाठी दूरवरील भावी भक्तांसाठी हेलिपॅड आणि छोटे विमान स्थळ उभारण्याचा प्रयत्न सुरू असून मोठे मोठे दानशूर भक्तांना या मुळे मोठी सुविधा मिळणार आहे मंदिर परिसरातील गाभारा पाच कोटी ७५ लाख रुपये किंमत असलेला गाभारा बांधकामाचे दिनांक १३ ऑक्टोबर रोजी भूमिपूजन भाविक भक्तांचे हस्ते करण्यात येणार आहे असे सांगत दसरा मेळाव्यामध्ये आपण विकास कामांविषयी आणि इतर बाबींबाबत भाष्य करणार आहोत असे सांगितले या कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारंभामध्ये एडवोकेट साहेबराव मस्के यांनी आमदार अनेक असतात परंतु सुरेश धस यांच्यासारखे प्रयत्नवादी आणि कठोर परिश्रम करणे आमदार कमी आहेत विकासाद्वारे गावांचा कायापालट करणे म्हणजे काय असते हे फक्त सुरेश धस यांनीच दाखवून दिलेले असून महायुती चा उमेदवार कोणीही असो परंतु सुरेश धस हेच श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गडाच्या विकासाचे शिल्पकार आहेत हे निर्विवाद सत्य असल्याचे सांगत संपूर्ण विधानसभा मतदारसंघातील जनतेने उघडा डोळे बघा नीट या पद्धतीने या विकास कामांकडे पाहावे असे सांगितले यावेळी श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गडावरील विकास कामे मंजुरी बद्दल सद्गुरु सेवा मंडळ आष्टी यांचे वतीने माजी राज्यमंत्री सुरेश धस आणि सावरगाव गावातील सभा मंडपाचे ३० लक्ष रुपये मंजूर असून गावकऱ्यांच्या आग्रहावरून ४५ लाख रुपयांचे काम करणाऱ्या दादासाहेब चितळे यांचा सत्कार करण्यात आला.

------------

### डॉ.योगेश क्षीरसागरांच्या नेतृत्वावर विश्वास

यावेळी माजी पंचायत समिती सभापती काकासाहेब जोगदंड, सरपंच बालासाहेब जाधव, नवगण शिक्षण संस्थेचे संचालक आमेर सिद्दिकी, विद्यार्थी जिल्हाध्यक्ष शुभम कातांगळे, पांडुरंग येडे, अभिमान येडे, सुभाष येडे, अशोक येडे, समीर शेख, फुलचंद येडे, श्रीराम घरत, सुनील घरत, माजेद कुरेशी, मिलिंद ठोकळ, दीपक जगदाळे, शिवाजी घरत, आसाराम घरत, राजेभाऊ क्षीरसागर उपस्थित होते. भाळवणी येथील विनोद बहिरवाळ, भारत डोंगर, संतोष मुळे, भाऊ मस्के, जयराम मस्के, अशोक बहिरवाळ, महेश चव्हाण, बिभीषण दहे, बाळू दहे, गणेश बहिरवाळ, शाम बहिरवाळ, अशोक दहे, किरण चव्हाण, वाघमारे, विलास बहिरवाळ, महादेव मुळे, संदीप मुळे, ऋषिकेश बहिरवाळ, रोहित बहिरवाळ, शुभम बहिरवाळ, सूरज चव्हाण, ओंकार बहिरवाळ, प्रमोद बहिरवाळ, सोमीनाथ दहे, बिभीषण दहे यांच्यासह अनेक तरुणांनी प्रवेश केला. यावेळी राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष शुभम कातांगळे, अमर विद्यागर आदी उपस्थित होते. शहरातील कागदी वेस, अजिजपुरा भागातील रवी वडमारे व त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रवेश केला. याप्रसंगी नगरसेवक मुन्ना इनामदार, शुभम धूत, बिलाल शेख, गजानन जवकर, शैलेश गिरी, ज्ञानेश्वर राऊत, किरण बेदरे, डॉ.शेख शकील, शुभम वीर आदींची उपस्थिती होती. आहेर वडगाव येथील शिवाजी रोहिटे यांनी त्यांच्या सहकाऱ्यांसमवेत पक्षात प्रवेश केला. याप्रसंगी बालासाहेब काटे, गोरख रोहिटे, बाळू रोहिटे, पिंटू सपकाळ, नवनाथ रोहिटे, कृष्णा सोळूंके, सचिन सोळूंके, जावेद शेख, अजित डोंगरे, धनंजय राऊत, मुकिंद रोहिटे, राजाभाऊ रांजवन, शहाजी कदम, लखन रोहिटे, सुदाम रोहिटे, निवेदक बाबासाहेब रांजवन यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर इनकमिंग होत असून विरोधी पक्षातील शेकडो युवक कार्यकर्ते, पदाधिकारी ना.अजितदादा, धनुभाऊंच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये डॉ.योगेशभैय्यांच्या नेतृत्वाखाली हाती 'घड्याळ' बांधून घेत आहेत. त्यामुळे बीड विधानसभा मतदारसंघात पक्षाची ताकद वाढली आहे.

**डॉ.क्षीरसागरांचा संघटन मजबूत करण्यावर भर**

ना.अजितदादा पवार, प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकरे, पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन डॉ.योगेश क्षीरसागर यांनी एक वर्षापूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. तेव्हापासून पक्षाची सदस्य नोंदणी, विविध पद नियुक्त्या, पक्षाचे प्रचार व प्रसाराचे कार्यक्रम राबविणे अशा माध्यमातून निष्ठेने काम करत संघटन मजबूत करण्यावर भर दिला आहे. विकासाचे व्हिजन, थेट जनसंपर्क, तत्पर यंत्रणेमुळे बीड विधानसभा मतदारसंघात डॉ.योगेश यांच्या नेतृत्वावर जनतेचा अधिक विश्वास असल्याचे स्पष्ट होत आहे. त्यांचा संघटन मजबूत करण्यावर कायम भर राहिला आहे.

----------

**CHANGE THE NAME**

Old Name -More Bhakti Anand
New Name -More Bhakti Anandrao
Address -A/p Ganesh nagar murshadpur Ashti Tal. Ashti Dist. Beed

**नावात केलेला बदल**

जुने नाव:–मोरे भक्ती आनंद
नवीन नाव :–मोरे भक्ती आनंदराव
**पत्ता:–मु. पो.गणेशनगर मुर्शदपूर आष्टी ता. आष्टी जि. बीड**

## शैलेश आंधळे यांची वर्ग-१ पदी निवड झाल्याबद्दल स्वागत

**वडवणी । प्रतिनिधी**



वडवणी येथील सुप्रसिद्ध आडत व्यापारी श्री भिक्कमजी आंधळे यांचे सुपुत्र शैलेश आंधळे यांनी २०२२ मध्ये झालेल्या एम पी एस सी च्या परीक्षेत नेत्र दीपक यश मीळऊन वर्ग-१चे अधिकारी होण्याचे स्वप्न पूर्ण केले .

या प्रित्यर्थ श्री शैलेश भिक्कजी आंधळे यांचे हृदयपूर्वक शिक्षक कॉलनीतील श्री रामनाथ शिवाजीराव डोईफोडे ,सौ.शोभाताई डोईफोडे व डी डी राऊत यांनी स्वागत केले. यावेळी स्वागत करताना श्री रामनाथ डोईफोडे व राऊत डी.डी यांनी शैलेश आंधळे यांना भावी आयुष्यासाठी व पुढील नेत्र दीपक वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा व्यक्त केल्या यावेळी शैलेश आंधळे यांच्या आई व वडिलांचाही हृदयपूर्वक स्वागत करण्यात आले

# माजलगाव अत्याचार घटनेच्या निषेधार्थ परळी सराफा मार्केट बंद

**परळी । प्रतिनिधी**

मजालगाव येथे पाच वर्षीय चिमूरडीवर झालेल्या अत्याचार निषेधार्थ परळी सराफा असोशीएषण कडून निषेध करत समस्त सराफ दुकाने बंद ठेऊन निषेध नोंद्विण्यात आला असून परळी तहसीलदार सह पालकमंत्री मा. धनंजयजी मुंडे साहेब यांना ही निवेदन देऊन तात्काळ या विक्रत नाराधामास फाशी देऊन चिमूर्डिस न्याय द्यावा असे निवेदन देण्यात आले.



अधिक माहिती अशी माजलगाव मधील एका शाळेच्या आवारात भरणाऱ्या अंगणवाडीमध्ये जाणाऱ्या पाच वर्षीय चिमुकलीवर शिक्षकानेच लैंगिक अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली होती. पीडित चिमुकली घटना घडल्यानंतर आजारी पडली तिला दवाखान्यात नेले असता उपचार करणाऱ्या डॉक्टरांच्या ही बाब लक्षात आली होती. त्यांनी याची कल्पना पालकांना दिल्यानंतर पालकांनी मुलीला विश्वासात घेऊन विचारपूस केली असता तिने घडलेला प्रकार सांगितला. ज्याने हे नीच कृत्य केले आहे त्याला ओळखत असल्याचे तिने सांगितले. दरम्यान गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी पीडित चिमुकलीला फोटो दाखवल्यानंतर तिने आरोपीस ओळखले. दरम्यान पोलिसांनी फरार आरोपी राहुल वायखिंडे (मूळ रा. ब्रह्मगाव ता.कोपरगाव जि. अहील्यानगर) याला ताब्यात घेऊन न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने चार दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे.या घटनेनंतर सर्वसामान्य जनतेत रोष व्यक्त केला जात आहे. समस्त परळी सराफ सुवर्णकार बांधवानी आपले दुकाने बंद ठेऊन तीव्र निषेध व्यक्त केला आहे त्वरित आरोपीस शिक्षा करावी असे निवेदन ही शहरातील तहसील, पोलिस स्टेशन, सह पालकमंत्री मा. धनंजयजी मुंडे साहेब यांना ही निवेदन देत सर्व सोनार बांधवानी आरोपीस त्वरित शिक्षा द्यावी अशी मागणी करण्यात आली आहे.

## पूजा राऊत हिची न्यायालयात स्टेनोग्राफर म्हणून निवड

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी येथील महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे कर्तव्यदक्ष व सर्व परिचित नेतृत्व परमेश्वर राऊत यांची कन्या कु.पूजा परमेश्वर राऊत हिची स्टेनोग्राफर कोर्टात नुकतीच निवड झाली.

तिने स्टेनोग्राफर म्हणून बीड जिल्ह्यातील ता.केज न्यायालयात पदस्थापना दिनांक ५ आक्टोबर २०२४ रोजी संपन्न झाली.या प्रित्यर्थ पूजा राऊतचे स्वागत तिच्या पिताजी सोबत करण्यात आले. स्वागत करताना प्राचार्य राऊत डी.डी.व श्री डोईफोडे आर.एस. सोबत दिसत आहेत.



पूजा तुझे अभिनंदन ...! पूजा राऊत ही महाराणी ताराबाई विद्यालयाची माजी विद्यार्थीनी आसुन शालेय जिवनापासुनच ही ज्ञान साधनेच्या सतत शोधात आसनारी कन्या तिच्या या गुणग्राहकतेमुळे खडतर व कठिण परीश्रमामुळे हे यश प्राप्त झाले. पूजाने मीळवलेले हे यश ग्रामीण भागातिल विद्यार्थ्यांना मार्गदर्शक ठरेल अशी प्रतिक्रिया राऊत डी.डी.व श्री डोईफोडे सर यांनी व्यक्त केली.

## जिल्हास्तरीय लोकशाही दिनात एकुण तीन अर्ज प्राप्त

बीड । प्रतिनिधी

जिल्हास्तरीय लोकशाही दिनामध्ये लोकशाही दिनाचे ०३ अर्ज प्राप्त झाले. जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रगती सभागृहात लोकशाही दिन संपन्न झाला. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, अदित्य जीवने, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपजिल्हाधिकारी (सामान्य) शैलेस सुयवंशी, तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी, जिल्हा पोलीस मुख्यालय, जिल्हा परिषद, पाटबंधारे विभाग सार्वजनिक बांधकाम विभाग, परिवहन विभाग, सहकार विभाग, कृषी विभाग व पाणी पुरवठा विभाग, समन्वय अधिकारी इत्यादी जिल्हा स्तरावरील प्रमुख अधिकारी व ज्या कार्यालयाकडून लोकशाही दिनातील प्रलंबित प्रकरणे होती, ते संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## खोलेश्वर महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा विभागा अंतर्गत विविध परीक्षांचे आयोजन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

सध्याच्या स्पर्धेच्या युगामध्ये विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची गोडी लागुन भविष्यात ते अधिकारी घडावेत यासाठी खोलेश्वर महाविद्यालयामध्ये स्पर्धा परीक्षा विभाग कार्यरत आहे . या विभागा अंतर्गत स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना नियमित तासिकांचे आयोजन करून तज्ञ प्राध्यापकांमार्फत मार्गदर्शन करण्यात येते. याच उपक्रमाचा भाग म्हणून दिनांक ५ ऑक्टोबर २०२४ रोजी बँकिंग आणि पोलीस भरती या परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते, या परीक्षेमध्ये बँकिंग विषयात बीकॉम तृतीय वर्षाची विद्यार्थिनी पायल नायबल प्रथम आली ,तसेच पोलीस भरती विषयामध्ये बीए प्रथम वर्षाचा नितेश सोंनर प्रथम आला त्याबद्दल प्राचार्य डॉ मुकुंद देवर्षी, संस्था पदाधिकारी केंद्रीय कार्यकारणी सदस्य व महाविद्यालयीन विकास समितीचे अध्यक्ष राम काका कुलकर्णी तसेच स्थानिक कार्यवाह व मार्गदर्शक किरण दादा कोदरकर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन प्राचार्य डॉ मुकुंद देवर्षी यांनी केले .या परीक्षेसाठी स्पर्धा परीक्षा विभाग प्रमुख उपप्राचार्य डॉक्टर दीपक फुलारी , समन्वयक प्रा. रमण झरीकर ,प्रा. अनिल खोडेवाड व सहकारी यांनी परिश्रम घेतले.



## विस्थापितांचा आवाज म्हणजे आझाद क्रांती सेना -राजेश घोडे

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील कल्याण नगर येथे आझाद क्रांती सेनेच्या शाखेची स्थापना दि ०६ ऑक्टोबर शनिवार रोजी सायंकाळी करण्यात आली सेना प्रमुख आझाद क्रांती सेना राजेशजी घोडे यांच्या हस्ते या बोर्डाची फित कापून शाखेच्या अनावरण करण्यात आले याप्रसंगी आझाद क्रांती सेना नेते अशोक जी ढगे आझाद क्रांती सेना ऊसतोड कामगार संघटना धारूर तालुका अध्यक्ष बळीराम मस्के, आझाद क्रांती सेना ऊसतोड कामगार संघटना ता अध्यक्ष वडवणी सतीश हनवते,नेते तुकाराम शिंदे हे उपस्थित होते. याप्रसंगी बोलत असताना आझाद क्रांती सेना सेनाप्रमुख राजेश घोडे म्हणाले की सरकार आरक्षण हा मुद्दा लोकांमध्ये टाकून लोकांचं मुख्य मुद्द्यापासून लक्ष विचलित करण्याचं काम करत आहे सरकारची हिम्मत असेल तर खाजगी करणार एससी व एसटी ला आरक्षण द्यावं येणाऱ्या काळामध्ये आझाद क्रांती सेना खाजगीकरणात आरक्षण मिळावं यासाठी व्यापक स्वरूपाचे आंदोलन उभा करणार आहे कारण की सद्यस्थितीमध्ये ९८% नोकऱ्या ह्या खाजगीकरणांमध्ये आहेत तर



सरकारी नोकऱ्या केवळ दोन टक्के आहे म्हणूनच आमचं म्हणणं आहे की खाजगी करणात आरक्षण लागू करावं. यावेळी विविध विषयावरती सडेतोड भूमिका मांडण्यात आली कल्याण नगर येथील शाखेचे अध्यक्ष आकाश गायकवाड, उपाध्यक्ष महेंद्र कीर्ते,सचिव दीपक मोरे,सहसचिव दिनेश कांबळे, विशाल सहजराव, सल्लागार भीमा वावळकर, सल्लागार रमेश किर्ती,कार्याध्यक्ष प्रदीप देशमाने यांनी गावातील विविध प्रश्न सोडवण्याची जबाबदारी घेतली हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रकाश किर्ते, तुकाराम अंभोरे, सुधाकर सहजराव, सचिन किर्ते, शिवाजी कीर्ती, नितीन कीर्ती, शकील शेख, परमेश्वर कीर्ती, युवराज कसबे, ऋतिक खिल्लारे, परमेश्वर पवार, योगेश पवार,रोहन गायकवाड,दीपक कीर्ते,किशन सोनवणे,गणेश वावळकर,धनंजय कसबे अजिंक्य कीर्तआर्यन कीर्ती, फारुख शेख सलीम, शेख समीर शेख,भारत निर्मळ, प्रदीप खिल्लारे, महारुद्र कांबळे यांनी परिश्रम घेतले.

पान ६ वरून...

### दोषींना शिक्षा हवी

आहेत म्हणून १५० ते २०० लोकांवर कारवाई करत असेल तर ते चुकीचेच आहेत आणि ते थांबलेच पाहिजेत कारण त्यामुळे बीड शहरातील लोकांमध्ये दहशत पसरलेली आहे, लोक कामावर सुद्धा जात नाहिये पडापड सुरू आहे, आणि ते थांबलेच पाहिजेची लेखी विनंती अर्ज माजी सभापती तथा शरदपवार राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष खुर्शीद आलम यांच्या नेतृत्वात आज शिष्टमंडळाने पोलिस अप्पर पोलिस अधीक्षक श्री.पांडकर साहेबांकडे केली आहे, यावेळी नगरसेवक मुखील लाला, नगरसेवक लक्ष्मण विटकर, नगरसेवक मतीन भाई,संपादक पठाण अय्युब खान,समाजसेवक जावेद भाई,सैय्यद हादी,मोहम्मद शाहनवाज आदी मान्यवर उपस्थित होते,

### राष्ट्रवादी भटक्या विमुक्त सेलची

नियुक्ती करण्यात आली. खा.शरदचंद्र पवार यांच्या विचारानुसार पुढील काळात पक्षाच्या माध्यमातून सर्वसामान्यांच्या विकासांत आपण भरीव कार्य कराल व पक्ष संघटना अधिक मजबुतीने उभी कराल ही अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. सदरील नियुक्तीबद्दल सर्वस्तरांतून तालुका उपाध्यक्षपदी धनराज गित्ते तर संघटकपदी सतीश कुंडगिर यांचे स्वागत व अभिनंदन होत आहे. दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट) चे परळी विधानसभाचे राजेभाऊ फड व राष्ट्रवादी भटक्या विमुक्त सेलच्या (शरदचंद्र पवार गट) तालुका अध्यक्ष गणेश देवकते यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी नियुक्तीपत्र देतांना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट) चे शहराध्यक्ष जिवनराव देशमुख, युवक शहर अध्यक्ष सय्यद फिरोज, युवा ओबीसी सेलचे तालुका अध्यक्ष हनुमंत फड तालुका उपाध्यक्ष गोविंद देशमुख, कारभारी गित्ते, अमोल गुट्टे, समाधान गित्ते, जीवन गित्ते तसेच सुरेश देशमुख इतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

### सेवानिवृत्त शिक्षक

चेअरमन,अंमळनेर-पिंपळवंडी केंद्रातील आजी-माजी केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक,शिक्षक आदिसह नातेवाईक,पत्रकार,राजकीय, सामाजिक व विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.त्यांच्या पश्चात पत्नी,विवाहित तीन मुले अशोक तसेच माजी ग्रा.पं.सदस्य नरहरी, शालेय व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष राजेंद्र तसेच एक विवाहित मुलगी, जावई,सुना,नातवंडे असा परिवार आहे.वाघमारे कुटुंबीयांच्या दुःखात दैनिक राज्य लोकतंत्र परिवार सहभागी आहे.

### शेतकऱ्यांसाठी आनंदाची बातमी

केली.धरण परिक्षेत्रात सततधांर पडणाऱ्या पावसामुळे व जायकवाडीतून सुरू असलेल्या फ्लोमुळे माजलगाव धरण एकाच दिवसात मृतसाठ्यातून उपयुक्त साठ्यात आले होते.दरम्यान आतापर्यंत झालेल्या पावसामुळे माजलगाव धरणात पाण्याची मोठ्या प्रमाणात आवक सुरू झाल्याने दि ०७ ऑक्टोबर सोमवार रोजी सकाळी ६:०० वाजण्याच्या सुमारास माजलगाव धरणाची पाणी पातळी ७५.५१ टक्क्यावर पोहोचली आहे.तर धरणात येणारी पाण्याची आवक १.६२/२९४.३०८ ३ ने सुरु आहे.त्यामुळे माजलगाव,बीड शहरांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी मिटणार असुन तालुक्यातील शेतकऱ्यांचा सिंचनाचा प्रश्न देखील मिटणार असल्याने तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी व नागरीकांसाठी ही सुखद व आनंदाची बाब म्हणावी लागेल.

### मतदार जनजागृती रॅलीसाठी

प्रमाणे घोषवाक्य तयार करून रॅलीमध्ये घोषणा देऊन जनजागृती करावी

मतदान करुयामतदानासाठी वेळ काढा, आपली जबाबदारी पार पाडा चला मतदान करू या, लोकशाही रुजवू या.वाढवू तिरंग्याची शान करूया देशासाठी मतदान.आपले मत आपले भविष्य,जना मनाचा पुकार, मतदान आपला अधिकार,

मतदान राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो,वृद्ध असो किंवा जवान, सर्वजण करा अवश्य मतदान ,आपल्या अमूल्य मताचे दान, आहे लोकशाही ची शान.चला मतदान करूया लोकशाही रुजवू या मतदान हा अधिकारच नाही तर कर्तव्य सुद्धा आहे,१८ वर्षाचे वय केले पार घेऊया मतदानाचा अधिकार सर्वांची आहे ही जबाबदारी मत देणार सर्व नर नारी,चला चला मतदान करू जनहिताचे शासन आणू. अशा विविध आशयाचे घोषवाक्य तयार करून रॅलीमध्ये जनजागृती करावी असे त्यांनी यावेळी सांगितले.

## 'हॅप्पी इंडियन व्हिलेज' मधील मुलेच माझे ईश्वर आहेत -रवी बापटले

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

दिनांक ६ ऑक्टोबर २०२४ रोजी आतंरभारती अंबाजोगाई च्या वतीने हॅप्पी इंडियन व्हिलेज हसेगाव ता. जि. लातूर या सामाजिक प्रकल्पाला अंबाजोगाई शहरातील आंतरभारतीचे राष्ट्रीय कार्यकारणी कार्यकर्ते मा. अमर हबीब, आंतरभारती अंबाजोगाई च्या अध्यक्ष प्रा. डॉ. शैलजा बरुरे, उपाध्यक्ष आशाताई वाघमारे,कोषाध्यक्ष महावीर भगरे, तारका वानखेडे , श्री. शरद लंगे, अनिकेत डीघोळकर,यांच्यासह ६० सदस्यांनी भेट दिली. याप्रसंगी सेवालयाचे संचालक सामाजिक कार्यकर्ते रवी बापटले यांनी ''आपल्या हॅप्पी इंडियन व्हिलेज मधील मुलेच माझे ईश्वर आहेत, अशी भावना व्यक्त केली.'' याप्रसंगी ज्येष्ठ पत्रकार मा. अमर हबीब यांनी ''सेवालाय हे आधुनिक तीर्थक्षेत्र असल्याचे म्हटले.''

आंतर भारती अंबाजोगाई च्या वतीने मराठवाड्यातील विविध सामाजिक प्रकल्पांना भेट देण्यात येणार आहेत.




यातील पहिली भेट हॅप्पी इंडियन व्हिलेज येथे झाली.हासेगाव येथील हॅप्पी इंडियन व्हिलेज एचआयव्ही पॉझिटिव्ह मुलांचे जगातील पहिले गाव आहे. या सामाजिक प्रकल्पाला भेट दिल्यानंतर निवडक मनोगत झाली.ज्येष्ठ पत्रकार व आंतरभारती राष्ट्रीय कार्यकारणीचे कार्यकर्ते मा. अमर हबीब यांनी सेवालय हे समाजातील सर्वात वंचितांचे जीवन घडविणारे तीर्थक्षेत्र असल्याची भावना व्यक्त केली. अशा सामाजिक प्रकल्पांना पाठबळ देण्यासाठी समाजातील व्यक्तीने पुढाकार घ्यावा अशी भावना व्यक्त केली. आंतरभारतीच्या अध्यक्ष प्रा. डॉ. शैलजा बरुरे यांनी अशा सामाजिक प्रकल्पांना जोडून घेणे म्हणजे आपल्यातल्या माणूस असण्याच्या क्षमता वाढविणे, असे मत व्यक्त केले.

या सामाजिक प्रकल्प भेटीत अंबाजोगाई शहरातील सर्व नागरिकांनी हासेगाव येथे हॅप्पी इंडियन व्हिलेज येथील सर्व मुलांशी संवाद साधला. या प्रकल्पातील आभाळतळ, ड्रॅगन शेती, एकूण सर्व स्थळांना भेटी दिल्या .तेथील उपक्रम समजून घेतले. वृक्षारोपण केले. अंबाजोगाईकरांनी व सेवालयातील मुलांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला.रवी बापटले यांनी आपल्या मनोगतात ''हा आजार आमची जगण्याची ऊर्जा बनली आहे, असे मत व्यक्त केले. ही मुलेच माझी ईश्वर असल्याची भावना व्यक्त करून यांच्यावर प्रेम करणे, यांचा सांभाळ करणे, हीच माझी प्रार्थना आहे, असे म्हटले.

या सामाजिक प्रकल्प भेटीत हॅप्पी इंडियन व्हिलेज प्रकल्पाला आंतरभारतीचे सदस्य व जेष्ठ कवी श्री. गणपत व्यास, श्री. उदय असरडोहकर, डॉ.दिलीप खेडगीकर, डॉ.सुलभा खेडगीकर, श्री ओमकेश दहिफळे,श्री. शेंगोळे सर,लेखक श्री. युवराज माने, कवयित्री संध्या सोळंके, कवयित्री तिलोत्तमा पतकराव, अमृत महाजन, सौ. कल्पना महाजन, पत्रकार किरण देशमुख, श्री संकेत तोरंबेकर व स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी सहभागी झाले होते.

## भ्रष्टाचार निर्मुलन समिती बैठक संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हास्तरीय भ्रष्टाचार निर्मुलन समिती बीड तथा जिल्हाधिकारी बीड यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

बीड जिल्हयातील शासकीय कर्मचा-यांविरुध्द प्राप्त होणा-या तक्रारींबाबत पाठपुरावा करण्यासाठी जिल्हास्तरीय भ्रष्टाचार समिती स्थापन करण्यात आली असून त्याअनुषंगाने प्राप्त तक्रारीची पडताळणी करुन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी संबधित तक्रारीविषयी प्राप्त तक्रारीला पत्राव्दारे उत्तरे देण्याच्या सूचना संबंधितांना दिल्या. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, अदित्य जीवने, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपजिल्हाधिकारी (सामान्य) शैलेस सुयवंशी, तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी तसेच संबधित विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# वृक्षतोडीसाठी ५० हजार रुपये तरतुदीचा शासन निर्णयात बदल करा - भाई थावरे

**माजलगाव । प्रतिनिधी**

राज्यात होणारी बेकायदेशीर वृक्षतोड थांबविण्यासाठी वृक्षतोड करणाऱ्यांवर एक हजार रुपये दंडाची शिक्षा देण्याचा निर्णय शासनाने घेतला होता. या निर्णयात बदल करुन शासनाने दंडाची रक्कम ५० हजारांवर केली आहे. मात्र अनेक लोकांचे जीवन, व्यवसाय हा लाकडावर अवलंबून असल्याने वृक्षतोडीसाठी ५० हजार रुपये तरतुदीचा शासन निर्णयात बदल करावा अशी मागणी शेतकरी नेते भाई गंगाभिषण थावरे यांनी माजलगाव तहसीलदारांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, राज्यात होणारी वृक्ष तोड ही शेतकरी यांच्या शेत जमीन मधील मालकी हक्काच्या प्रकारची आहे. शेतकरी स्वतःच्या शेतीत केलेली वृक्ष लागवडीची जोपासना करतो व ते झाडे जगवतो व त्यापासुन चार पैसाचा फायदा होईन या उद्देशाने झाड मोठे करतो व परीपक्व झाल्यानंतर त्या गरजेपोटी त्याची तोड करतो व त्यापासुन शेती उपयोगी अवजारे बनविण्यासाठी किंवा स्वतःच्या मुला बाळांच्या लग्न कार्यासाठी किंवा दवाखाण्यासाठी किंवा शेतकरीने घेतलेले कर्ज बँकेकडून कर्जापोटी केलेली हप्ते भरण्याकरीता




शेतकऱ्याला नाइलाजाने चार पैसे उपलब्ध होतील व आपल्या गरजा आडी अडचणी पुर्ण करण्यासाठी सदर मालकी हक्काची वृक्षतोड ना इलाजाने शेतकऱ्याला करावी लागते.

महाराष्ट्र शासनाच्या लक्षात आल्यावर दैनंदिन जिवनामध्ये लाकुड हे गरजेचे आहे असे लक्षात आल्यावर प्रधान मुख्य वनरक्षक महाराष्ट्र राज्य नागपुर यांनी दि. ०१ जुलै २०१७ रोजी दिलेले आदेशानुसार बाभुळ, निलगीरी, सुबाभुळ, आकाशीया, अशोका, सुर भेंडी, मळबार लिंब या १७ प्रकारचे प्रजाती चे वाहतुक करत असतांना परवानगीतुन शासनाने सुट देण्यात आलेली आहे व या मागे ग्रामीण अर्थव्यवस्थेचे शेतकरीचे चलन चालु रहावे हा उद्देश होता. शासनाने जे झाडाला परवानगीतुन सुट दिली आहे असे झाडे तोडणे दैनंदिन जीनामध्ये आवश्यक आहे. जसेकी १) जळाउ सरपण उपलब्ध व्हावे म्हणुन, २) हातमाग यंत्र, आरागिरणीयंत्र व्यवसायासाठी, (साईजिंग) जसे की इचलकरंजी, मालेगांव, भिवंडी येथे हातमाग व्यवसाय चालतो. त्यामध्ये लाखो लोग, कामगार यावर अवलंबुन आहे. त्यासाठी जळावु लाकुडे हे गरजेचे आहे. त्यापासुन शासनाला अर्थखात्याला, जी.एस.टी. व इन्कमटॅक्स महसुल मिळतो. जर हे बंद झाले तर लाखो कामगार बेरोजगार होतील व शासनाला ही आर्थीक नुकसान होईल. जळाऊ लाकडापासून खाद्यपदार्थ, बेकरी उत्पादन, टोस, पाव, खारी, गोरगरीब लोकांचे अनन तयार करणेसाठी उपयोग होत आहे व तो बंद झाल्यास गोर गरीब, कष्टकरी कामगारांची उपासमारीची वेळ येईल. लाकडापासुन भटके विमुक्त जातीचे लोक म्हणजे आठवडे बाजार मध्ये गावोगावी जाऊन शेतीयुक्त अवजारे विकणारे लोहार, सुतार व बांधकामसाठी लागणारे चौकट, खिडकी, बैलगाडी, घरगुती वस्तु बनवणाऱ्या कष्टकरी मजुरांवर उपासमारीची वेळ येईन. महत्तवाचा मुद्दा माणुस मेल्यावर सर्व जाती धर्माच्या लोकामध्ये कुठल्या ना कुठल्या लाकडाचा वापरा शिवाय अंतिम विधी पूर्ण होत नाही. यामुळे शासनाने वृक्षतोडीसाठी ५० हजार रुपये तरतुदीचा शासन निर्णयात बदल करावा अशी मागणी भाई थावरे यांनी केली आहे.

# निवडणुकीच्या तोंडावर राजू शेट्टी घेणार ऊस परिषद



सोलापूर : राज्यात होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीत सत्ताधारी महायुतीसह महाविकास आघाडीच्या समोर समोर बंडखोरीचे संकट उभे आहे. यातच आता तिसऱ्या आघाडीने देखील पेच निर्माण केला आहे. याचदरम्यान आता तिसऱ्या आघाडीचे नेते माजी खासदार राजू शेट्टी यांनी स्वाभिमानी शेतकरी संघटनेची ऊस परिषद २५ ऑक्टोबर रोजी घेण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे या परिषदेतून शेट्टी यांच्यासह तिसरी आघाडी विधानसभा निवडणुकीचे रणशिंग फुंकण्याची शक्यता आहे.

संभाजीराजे छत्रपती, राजू शेट्टी आणि बच्चू कडू यांनी एकत्र येत परिवर्तन महाशक्ती तिसरी आघाडी निर्माण केली आहे. तर सत्ताधारी महायुतीसह महाविकास आघाडीला शह देण्यासह पर्याय देण्यासाठीच आघाडीची निर्मिती केल्याचे मत नेत्यांचे आहे. तर राज्यात शेतकऱ्यांच्या प्रश्नावरून आता आघाडीने सत्ताधाऱ्यांसह प्रमुख विरोधक असणाऱ्या मविआला घेरले आहे. आता राज्याच्या राजकारणात कमबॅक करण्यासाठी शेट्टी यांनी कंबर कसत राजकारण तापवण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. राजू शेट्टी यांनी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्यावतीने यंदाच्या गळीत हंगामातील २३ वी ऊस परिषद घेण्याची घोषणा केली आहे. ही ऊस परिषद २५ ऑक्टोंबरला जयसिंगपूर येथील विक्रमसिंह क्रिडांगणावरती होणार आहे. तर गत हंगामातील उसाच्या दुसऱ्या हप्त्याचे प्रतिटन दोनशे रूपये देण्याची मागणी त्यांनी केली आहे. तसेच पैसे दिले नाहीत तर कारखान्यांचे धुराडी पेटवू देणार नाही, असाही इशारा शेट्टी यांनी दिला. तसेच या परिषदेतून शेट्टी विधानसभा निवडणुकीचं रणशिंग फुंकतील असे बोलले जात आहे. तर आता ऊस परिषदेतून शेट्टी सत्ताधारी महायुतीला घेरणार की मविआवर हल्लाबोल करणार? निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर स्वाभिमानी शेतकरी संघटना कोणती भूमिका घेणार? याकडे पश्चिम महाराष्ट्रासह राज्याचे लक्ष लागले आहे. याआधी देखील शेट्टी यांनी महायुती आणि महाविकास आघाडीवर आसूड ओढले होते.

# हळदीवरील कंदमाशी रोखण्यासाठीचे उपाय



सद्य परिस्थितीमध्ये शेतात गेल्यानंतर मुंगळ्याच्या आकाराचे कंदमाशीचे प्रौढ उडताना मोठ्या प्रमाणात दिसून येतील. याकडे वेळीच लक्ष देऊन व्यवस्थापन करून उपाययोजना केल्या तर चांगला फायदा होतो.

कंदमाशी ही हळद पिकावरील नुकसान करणारी प्रमुख कीड आहे. कंदमाशीचा प्रौढ डासासारखा परंतु मुंगळ्याप्रमाणे आकाराने मोठा व काळसर रंगाचा असतो. प्रौढ माशीचे पाय शरीरापेक्षा लांब असतात. पायांची पुढील टोके पांढऱ्या रंगाची असतात. दोन्ही पंख पातळ व पारदर्शक असून, त्यांच्यावर राखाडी रंगाचे दोन ठिपके असतात. ज्या ठिकाणी हळदीचे कंद उघडे पडलेले असतील त्या ठिकाणी जमिनीलगत प्रौढ माशी अंडी देते व अशा अंड्यातून अळ्या बाहेर पडून उघड्या गड्डयामध्ये शिरून त्यांच्यावर उपजीविका करतात. अशा गड्डयामध्ये नंतर बुरशीजन्य रोगांचा आणि काही सुत्रकृमींचा शिरकाव होतो. त्यामध्ये खोड व गुद्दे मऊ होतात व त्यांना पाणी सुटून ते कुजतात. जास्त दिवस लांबलेला पावसाळा कंदमाशीसाठी अधिक प्रमाणात अनुकूल असतो. वेळीच लक्ष दिले नाही तर या कीडीमुळे हळद पिकामध्ये ४५ ते ५० टक्के नुकसान होते. ही कीड जुलै-ऑगस्ट ते पिकाच्या काढणीपर्यंत नुकसान करत राहते.

व्यवस्थापनाचे उपाय :

जुलै ते ऑक्टोंबर दरम्यान १५ दिवसांच्या अंतराने क्विनालफॉस २५% टक्के २० मि.ली. किंवा डायमिथोएट ३० टक्के १० मि.ली. प्रति १० लिटर पाणी या प्रमाणे सोबत चांगल्या दर्जाचे स्टिकर मिसळून आलटुन-पालटून फवारावे. उघडे पडेलेले कंद मातीने झाकून घ्यावेत. वेळेवर हळदीची भरणी करावी. तसेच जमिनीतून क्लोरपायरीफॉस ५० टक्के ५० मि.लि. प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात घेऊन आळवणी करावी. याच पद्धतीने आळवणी एक महिन्याच्या अंतराने प्रत्येक महिन्यात एकदा करावी. कंदमाशी मुळे कंद कूज झाली असल्यास मुख्य किटकनाशकासोबत एका बुरशीनाशकाची तज्ञांच्या सल्ल्याने मिसळून आळवणी करावी.

त्याचबरोबर एकरी २-३ पसरट तोंडाची भांडी वापरून प्रत्येक भांड्यात एरंडीचे २०० ग्रॅम भरडलेले बी घेऊन त्यात १ ते १.५ लिटर पाणी घ्यावे. ८ ते १० दिवसांनी या मिश्रणामध्ये तयार होणाऱ्या विशिष्ट गंधाकडे कंदमाशीचे प्रौढ आकर्षित होतात व त्यात पडून मरतात. हळद पीक काढल्यानंतर शेतात राहिलेल्या पिकांचे अवशेष, सडके कंद जमा करून नष्ट करावेत.

# शेळ्या मेंढ्यातील आंत्रविषार; जाणून घ्या लक्षणे आणि उपचार!

शेळ्या मेंढ्यामध्ये आढळणारा आंत्रविषार हा आजार पावसाळ्यात उगवलेले कोवळे लुसलुशीत गवत भरपूर प्रमाणात खाल्ल्यामुळे या आजाराचा प्रादुर्भाव दिसून येतो. हा आजार सर्व वयोगटातील शेळ्या-मेंढ्यांना होतो. परंतु लहान करडे/कोकरांमध्ये मृत्युदर जास्त दिसून येतो. हा आजार कमी कालावधीचा आहे. प्रादुर्भाव झाल्यापासून दोन ते बारा तासांत मृत्यू होतो. त्यामुळे या आजारावर प्रतिबंधक उपाय करणे फारच गरजेचे आहे. जाणून घेऊया आजाराची लक्षणे आणि त्यावर उपचार.

आंत्रविषार आजाराची लक्षणे : शेळ्या-मेंढ्या निस्तेज दिसतात. एका जागेवर बसून राहतात. दूध पीत नाहीत. पातळ हिरव्या रंगाची संडास करतात. तोंडास फेस येतो, फिट येते. बाधित पिल्ले हवेत उडी मारून जमिनीवर पडतात. मान वाकडी होते. त्यांचा मृत्यू होतो. मोठ्या शेळ्या-मेंढ्या तीव्रतेनुसार काही दिवसांपर्यंत आजारी राहतात.

फऱ्यामध्ये ताप येणे, तोंडातून फेस येणे, अडखळत चालणे, तोल जाणे, गोल फिरणे, चक्कर येणे तसेच श्वसनास त्रास होणे इत्यादी लक्षणे दिसतात. शेवटच्या टप्प्यात पोटफुगी, जुलाब ही लक्षणे आढळून येतात. पोट फुगल्यामुळे जनावर उठबस करतात. सारखे पाय झाडतात.

आंत्रविषार आजारावर उपचार : हा अल्प मुदतीचा आजार असल्यामुळे प्रभावी उपचार करणे शक्य होत नाही. यासाठी अधिक खर्चसुद्धा होतो. पशुवैद्यकाच्या सहाय्याने विशिष्ट प्रतिजैविके दिल्यास पोटातील विष शोषण्याचे प्रमाण कमी होते, जीवाणूंची वाढ थांबते. कळपातील मरतुक कमी होऊ शकते. एखादे लिव्हर टॉनिक व शिरेवाटे ग्लुकोज दिल्यास फायदा होऊ शकतो. प्रथमोपचार म्हणून लहान पिलांना हगवण सुरू झाल्यानंतर मिठाचे पाणी किंवा इलेक्ट्रोलाईट्सचे द्रावण पाजावे. आजारास प्रतिबंध करणे, अत्यंत सोपे, कमी खर्चाचे, व प्रभावी मध्यम आहे. मुख्यता लसीकरण व आहारातील व्यवस्थापन करून या आजाराचा प्रादुर्भाव टाळता येतो.



# बटाटा लागवड तंत्रज्ञान



बटाटा पिकाचे लागवड पुणे, सातारा, नाशिक, अहमदनगर, बीड, औरंगाबाद आणि नागपूर या जिल्ह्यात केली जाते. बटाट्यामध्ये प्रथिने, चुना, फॉस्फरस या सारखी खनिजे, ब आणि क जीवनसत्वे भरपूर प्रमाणात असतात. बटाट्याचा उपयोग खाद्य पदार्थाशिवाय अनेक उद्योगधंद्यात मोठ्या प्रमाणात होतो.

हवामान : बटाटा हे थंड हवामानातील पिक आहे. या पिकास सरासरी १६ ते २१ सेल्सिअस तापमान लागते. पिकाच्या सुरवातीच्या काळात २४ सेल्सिअस पोषक असून बटाटे पोसण्याच्या काळात २० सेल्सिअस तापमान अनुकूल असते. बटाटे लागवडीच्या वेळी उष्ण हवामान व बटाटे पोसण्याचे वेळी थंड हवामान या पिकास पोषक असते.

जमीन : मध्यम ते हलक्या गाळाच्या जमिनीत बटाट्याची लागवड चांगल्या रीतीने करता येते. जमीन कसदार भुसभुशीत व उत्तम निचऱ्याची असावी. जमिनीचा सामू ६ ते ८ च्या दरम्यान असावा.

पूर्वमशागत : जमीन नांगरानी २० ते २५ सेंमी नांगरावी. १ महिनाभर जमिनीस उन्हाची ताप द्यावी. पुन्हा १ आडवी नांगरणी करावी. ढेकळे फोडण्यासाठी व जमीन समपातळीत आणण्यासाठी कुळवाच्या दोन तीन पाळ्या देऊन जमीन भुसभुशीत करावी, जमिनीत हेक्टरी ५० गाड्या चांगले कुजलेले शेणखत पसरावे.

लागवडीचा हंगाम : बटाट्याची लागवड खरीप हंगामात जून, जुलै महिन्यात करतात व रब्बी हंगामात ऑक्टोंबर, नोव्हेंबर महिन्यात करतात.

वाण : कुफरी लवकर - ही ६५ ते ८० दिवसात तयार होणारी जात असून खरीप व रब्बी हंगामात घेतली जाते. या जातीचे बटाटे पांढरे शुभ्र आकर्षक वव मोठे असतात. या जातीचा बटाटा साठवणुकीत चांगला टिकतो. हेक्टरी उत्पादन २०० ते २५० क्विंटल असते. कुफरी चंद्रमुखी - ही जात ९० ते १०० दिवसात तयार होते. या जातीचे बटाटे लांबट गोल व फिकट पांढरे असतात. साठवणुकीस ही जात उत्तम आहे. हेक्टरी उत्पादन २५० क्विंटल पर्यंत मिळते. कुफरी सिंदुरी - ही जात १२० ते १३५ दिवसात तयार होते. या जातीचा रंग फिकट तांबडा असून बटाटे मध्यम व गोल आकारचे असतात. ही जात साठवणुकीस उत्तम आहे. हेक्टरी उत्पादन ३०० क्विंटल पर्यंत मिळते. या शिवाय कुफरी बादशाह, कुफरी कुबेर, कुफरी ज्योती, अलंकार, कुफरी चमत्कार या जाती लागवडीस योग्य आहेत

बियाणाचे प्रमाण : बियाणे उत्तम दर्जाचे असावे. हेक्टरी १५ ते २० क्विंटल बियाणे लागवडीस पुरेसे असते. लागवडीपूर्वी बियाणे कॅप्टन ३० ग्रॅम आणि बविस्टोन १० ग्रॅम १० लिटर पाण्यात ५ मिनिटे बुडवून व नंतर लागवडीसाठी वापरावी.

लागवड : सरासरी बेण्याचे वजन जास्तीत जास्त २५ ते ३० ग्रॅम असावे. बेण्याचा आकार म्ध्याम असून बटाट्याचे आकारमानानुसार दोन ओळीतील अंतर ४५ ते ६० सेंमी आणि दोन बियांमधील अंतर १५ ते २० सेंमी ठेवावे. ट्रॅक्टरच्या सह्हायाने सरी वरंबापद्धतीने लागवड करावी

खते व पाणी व्यवस्थापन : बटाटा पिकास लागवडीपूर्वीहेक्टरी १०० किलो नत्र, ६० किलो पालाशाची आवश्यकता असते. लागवडीनंतर १ महिन्याने ५० किलो प्रती हेक्टर नत्र खताची दुसरी मात्रा द्यावी. बटाट्याची मुले जमिनीत वरच्या थरात वाढत असल्यामुळे या पिकास पाण्याच्या पातळीच्या वेळेस कमी पाणी द्यावे. लागवडीनंतर पहिले पाणी हलके द्यावे. जमिनीला लगतच्या फांद्या वाढून त्यांची टोके फुगीर होऊ लागल्यावर व बटाटा पोसण्याच्यावेळेस ६ ते ८ दिवसांच्याअंतराने पाणी द्यावे. पिकाची वाढ पूर्ण झाल्यावर पाण्याच्यापाळ्या कमी कराव्यात

आंतरमशागत : बटाट्याच्या आंतरमाशागतीत तण काढणे व खुरपणी या बरोबर भर देणे हे महत्वाचे काम आहे. तीन चार वेळा खुरपणी करून जमीन भुशभूशित ठेवावी. खताचा दुसरा हप्ता देताना झाडांना मातीचा भर द्यावी.

रोग व कीड : करपा - पानवर काळे ठिपके पडून पाने गळतात. बटाट्यावर खोलगट चट्टे पडतात. उपाय - डायथेनएम ३० ग्रॅम १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. मर - मोठी झाडे पिवळी व मलूल दिसतात. बुंध्याजवळ जमिनीलगतच्याभागावर बुरशीची वाढ झालेली दिसते. उपाय- पिकांची फरपालट आणि नियमित पाण्याच्या पाळ्या देऊन रोग आटोक्यात आणता येतो. जमिनीत नँप्थलीन किंवा फॉरमँलिन(१:५०) मिसळून दिल्यास रोगाचे बीज मरते. चारकोल राँट किंवा खोक्या रोग - या रोगाचा प्रसार जमिनीतून होतो. जमिनीचे तापमान ३२ सेल्सिअस पेक्षाअधिक असल्यास ते रोगजतूना पोषक ठरते. या रोगामुळे साठवणीतील बटाटे नसतात. उपाय- जमिनीचे तापमान ३२ सेल्सिअस च्या वर चढण्यापूर्वी बटाट्याचीकाढणी करावी किंवा पाणी देऊन जमिनीचे तापमान कमी ठेवावे.

कीड : देठ कुडतरणारी अळी - राखी रंगाची अळी असून रात्रीचे वेळी खोडाजवळील भाग कुरतडतात. पाने व कोवळे देठ खातात. उपाय - या किडीच्या बंदोबस्तासाठी क्लोरेड एम ५ % पावडर हेक्टरी ५० किलो जमिनीवर सायंकाळी धुराळावी मावा व तुडतुडे - या किडीत पानातील अन्नरस शोषून घेतात. त्यामुळे पाने पिवळी पडतात. उपाय- लागवडीनंतर १५ दिवसांनी मिथिल डिमेटॉन १० मिली १० लिटर पाण्यात मिसळून किंवा फॉस्फोमिडॉन ८५ डब्लू एमसी १० मिलि १० लिटर पाण्यात फवावरावे. बटाट्यावरील पंतग - ही किड बटाट्याचे अतोनात नुकसान करते. या किडीची सुरवात शेतातून होते. परंतु नुकसान हे साठवणुकीच्या काळात दिसून येते. या किडीच्या आळया पानात देठात व खोडात शिरून पोखरतात. आळया बटाट्यात शिरून आतील भाग पोखरून खातात. उपाय - या किडीच्या बंदोबस्तासाठी कार्बारील ५० डब्लू.पी. १.५ किलो ७५० पाण्यात मिसळून फावरावे.

काढणी व उत्पादन : सर्व सुधारित तंत्राचा उपयोग करून बटाट्याचे पिक घेतल्यास लवकर तयार होणार्या जातीचे उत्पादन हेक्टरी २०० क्विंटल व उशिरा तयार होणाऱ्या जातीचे उत्पादन हेक्टरी २५० ते ३०० क्विंटल पर्यंत होऊ शकते.




## महत्वाच्या घटना

१३२० : गाझी मलिक यांना गियाथ अल-दीन तुघलक या पदवीने दिल्लीचे सुलतान राजा म्हणून गौरविण्यात आलं. तसचं, त्यांचा मुलगा फखर मलिक यांना मुहम्मद शाह तुघलक अशी पदवी देण्यात आली.
१८३१ : विल्यम (चौथा) इंग्लंडच्या राजेपदी
१८५७ : ब्रिटिशांविरुद्धच्या उठावात भाग घेतल्याबद्दल रंगो बापूजी गुप्ते यांच्या मुलासह १८ क्रांतिवीरांना सातार्यातील गेंडा माळावर फाशी
१९०० : अमेरिकेच्या गॅल्व्हेस्टन येथे आलेल्या हरिकेनमुळे ८,००० ठार.
१९९१ : मॅसेडोनियाला (युगोस्लाव्हियाकडून) स्वातंत्र्य मिळाले.
१९४४ : दुसरे महायुद्ध लंडनवर पहिल्यांदा व्ही.२ बॉम्बचा हल्ला.
१९६२ : नुकतेच स्वातंत्र्य मिळालेल्या अल्जीरियाने नवीन संविधान अंगीकारले.
१९६६ : 'स्टार ट्रेक' या गाजलेल्या मालिकेचे प्रसारण सुरू झाले.
१९५४ : साऊथ इस्ट एशिया ट्रिटी ऑर्गनायझेशनची स्थापना
२००० : सिगरेट, तंबाखू व मद्याच्या जाहिराती दूरचित्रवाणी वाहिन्यांवर दाखविण्यास बंदी घालणारी दुरुस्ती केबल टेलिव्हिजन नेटवर्क कायद्यात करण्यात आली.
२००१ : लेगस्पिनर सुभाष गुप्ते आणि कर्णधार मन्सूर अलीखान ऊर्फ टायगर पतौडी यांची सी. के. नायडू पुरस्कारासाठी निवड
२००६ : महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्याच्या मुस्लिमबहुल मालेगाव या जिल्ह्यात बॉम्बस्फोट झाले होते. त्यात सुमारे ३७ लोक ठार तर १३० जन जखमी झाले होते.

## जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८३० : नोबेल पारितोषिक विजेते फ्रेंच कवी फ्रेडरिक मिस्त्राल यांचा जन्म.
१८४६ : भारतीय-हाँगकाँग उद्योजक व राजकारणी पॉल चेटर यांचा जन्म. (मृत्यू: २७ मे १९२६)
१८४८ : व्हिक्टर मेयर जर्मन रसायनशास्त्रज्ञ (मृत्यू: ८ ऑगस्ट १८९७)
१८८७ : स्वामी शिवानंद सरस्वती योगी व आध्यात्मिक गुरू (मृत्यू: १४ जुलै १९६३)
१९८६ : अर्जुन पुरस्कार सन्मानित भारतीय बॅडमिंटन खेळाडू पी. कश्यप यांचा जन्मदिन.
१९०१ : दक्षिण आफ्रिकेचे पंतप्रधान हेन्ड्रिक व्हेरवोर्ड यांचा जन्म.
१९१८ : नोबेल पारितोषिक विजेते ब्रिटिश रसायनशास्त्रज्ञ डेरेक हॅरोल्ड रिचर्ड बार्टन यांचा जन्म.
१९२५ : पीटर सेलर्स इंग्लिश विनोदी अभिनेता आणि गायक (मृत्यू: २४ जुलै १९८०)
१९२६ : भूपेन हजारिका संगीतकार व गायक (मृत्यू: ५ नोव्हेंबर २०११)
१९३३ : आशा भोसले गेली पन्नास वर्षे रसिकांच्या मनावरील स्वरमोहिनी कायम ठेवणार्या प्रसिद्ध पार्श्वगायिका
१९३६ : पद्मविभूषण पुरस्कार सन्मानित भारतातील सर्वात मोठ्या बॅनेट, कोलमन अँड कंपनी लिमिटेड या वर्तमानपत्र समूहाच्या अध्यक्षा इंदू जैन यांचा जन्मदिन.
१९३८ : भारतीय हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताच्या ग्वालेर घराण्यातील गायक पंडित लक्ष्मी गणेश तिवारी यांचा जन्मदिन.
११५७ : रिचर्ड (पहिला) इंग्लंडचा राजा (मृत्यू: ६ एप्रिल ११९९)

## मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

७०१ : पोप सर्गिअस (पहिला) (जन्म: १५ डिसेंबर ६८७)
१९५२ : मध्ये झालेल्या मराठवाडा साहित्य संमेलनाचे तसेच १९६२ मधे नांदेड येथे झालेल्या साहित्य संमेलनातील कविसंमेलनाचे ते अध्यक्ष होते. त्यांचे 'वेलांटी', 'पहाटतारा', 'शततारका', 'रुद्रवीणा', 'दोनुली', 'मरणगंध' इ. काव्यसंग्रह तसेच अनेक ललित, स्फुट व समीक्षणात्मक लेख प्रसिद्ध आहेत. त्यांच्या 'मावळते शब्द' या कवितेला कवी केशवसुत पारितोषिक मिळाले. (जन्म: ६ आक्टोबर १९१३)
१९६० : फिरोझ गांधी इंदिरा गांधी यांचे पती, पत्रकार व राजकारणी (जन्म: १२ सप्टेंबर १९१२)
१९६५ : नोबेल पारितोषिक विजेते जर्मन रसायनशास्त्रज्ञ हेर्मन स्टॉडिंगर यांचे निधन.
१९८० : नोबेल पारितोषिक विजेते अमेरिकन रसायनशास्त्रज्ञ विल्लर्ड लिब्बी यांचे निधन.
१९८१ : निसर्गदत्त महाराज अद्वैत तत्त्वज्ञानी (जन्म: १७ एप्रिल १८९७)
१९८२ : शेख अब्दुल्ला शेर ए कश्मीर (जन्म: ५ डिसेंबर १९०५)
१९९१ : वामन रामराव तथा 'वा. रा.' कांत कवी. त्यांची 'सखी शेजारिणी तू हसत रहा', 'त्यातरुतळी विसरले गीत', 'बगळ्यांची माळ फुले अजुन अंबरात', 'राहिले ओठातल्या ओठात वेडे शब्द माझे' इ. भावगीते लोकप्रिय आहेत.
१९९७ : कमला सोहोनी पहिल्या भारतीय महिला जैवरसायनशास्त्रज्ञ व आहारशास्त्रातील तज्ञ (जन्म: १८ जून १९११)
२०१० : मुरली तामिळ अभिनेता (जन्म: १९ मे १९६४)

# जनता बोलली तर नेते वठणीवर येतील -अमरसिह पंडित

## अमर नाईकवाडे-फारूक पटेल यांच्या प्रयत्नाने विविध विकास कामांचा शुभारंभ

बीड । प्रतिनिधी

माझा हा मतदार संघ नाही मी येथील उमेदवार नाही केवळ पालकमंत्र्यांच्या प्रतिनिधी म्हणून या विकास कामाच्या शुभारंभास उपासथित आहे कारण विकास काम करणे हा माझा छंद झाला आहे अनेक कामासाठी पुढाऱ्यांची गरज नसतं गरज लागते पण नेत्यांनी गाड्यात कार्यकर्त्यांच्या गारद्या ऐवजी जरा गल्लीबोळात फिरले तर समस्या समजतील पण तसे होताना दिसत नाही मी माझ्या मतदार संघात गावागावात जातो अडचणी समजावून घेतो जो पर्यंत जनता नेत्याला प्रश्न विचारणार नाहीत किंवा समस्या मांडणार नाही तो पर्यंत नेते वठणीवर येणार नाहीत असे प्रतिपादन राष्ट्रवादीचे प्रदेशसरचिटणीस माजी आ अमरसिह पंडित यांनी केले. बीड शहरातील चर्चेचा विषय असलेल्या जालाना रोड ते अमरधाम मोंढा या रस्त्याची या रस्त्यासह शहरातील जवळपास ३२ विकास कामाचा शुभारंभ आज करण्यात आला नगरसेवक अमर नाईकवाडे फारूक पटेल यांच्या प्रयत्नातून या कमला मंजुरी मिळाल्यानंतर आयोजित कार्यक्रमास राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण,विजय बंब ,जलील पठाण,मोईन मास्टर,अविनाश नाईकवाडे, महादेव उबाळे, बाळासाहेब गुजर, बाबुराव दुधाळ, विष्णू वाघमारे, गेवराई बाजार समितीचे सभापती मुजीब पठाण, शकील खान, अश्फाक इनामदार,गणेश तांदळे,प्रभाकर पोपळे, भैय्यासाहेब मोरे, आक्रम बागवान, शेख सादेक, रामदास सरवदे, संतोष क्षीरसागर, दिगंबर फाटे, नागेश कादे, गौरव जावळे, संतोष चांदणे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

आ.अमरसिंह पंडीत म्हणाले, जिल्ह्याच्या ठिकाणी रस्त्याची अशी अवस्था असावी हे दुर्देवी आहे. या मोंढा रस्त्यावरून जाताना अंगावरून काटा यायचा, बीडसाठी हे भूषणावह नाही. अलीकडे पुढारी सगळीकडे लागतो, आपण आपली कामे लोकप्रतिनिधीला सांगायला पाहिजेत. न सांगितल्यामुळे बीडची त्यामुळे बकाल अवस्था झाली आहे. बीड शहरात रस्त्यावर केर कचरा पडलेला दिसतो,लांबलचक बोलणे खूप सोपे आहे पण या सर्व समस्यांची जबाबदारी कोणी घ्यायची हा प्रश्न आहे. गेल्या काही वर्षात बीड शहरावर तब्बल ३१५० कोटी खर्च झाले आहेत. संस्था हे तुमचे मानबिंदू आणि शक्तीस्थळ राहिले पाहिजेत बीडमध्ये मात्र असे काही राहिलेले



दिसत नाही.मी बीडच्या या कामासाठी फार काही केलेले नाही केवळ मध्यस्थी केली, या शहराचे प्रश्न गल्लीबोळात गेल्याशिवाय कळणार नाहीत नेते बाहेरच फिरतात.त्यामुळे एकटे फिरले पाहिजे.मी दिलेला शब्द पाळतो दुचाकीवरून फिरून आमचे प्रश्न पहा हे तुम्ही तुमच्या लोकप्रतिनिला सांगा,त्याशिवाय तुमचे प्रश्न सुटणार नाहीत, लोकप्रतिनिधीला चांगले काम करायची सवय जनतेने लावली पाहिजले.तुमचे प्रश्न मांडा. बीड शहरात आजही पंधरा दिवसात दोनदा नव्हे तर केवळ एकदा पाणी येते, मग शहराचा विकास काय झाला आहे हे लक्षात घेतले पाहिजे. प्रास्ताविक अमर नाईकवाडे यांनी केले. ते म्हणाले, शहरातील ३५ विविध विकास कामाचा आज शुभारंभ झाला आहे, पालकमंत्री धनंजय मुंडे हे बीडला येणार होते मात्र त्यांना छत्रपती संभाजीनगर येथून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह मुबंईला जावे लागले,त्यामुळे ते येऊ शकले नाहीत. या रस्त्याचा प्रश्न आता खऱ्या अर्थाने मार्गी लागला आहे. सर्वांनी या कामासाठी पाठपुरावा केला. जालना रोड ते अमरधाम स्मशानभूमीपर्यंतचा रस्ता दर्जेदार व्हावा ही गेल्या दहा वर्षांपासून हा रस्ता करावा म्हणून सर्व शहरवासीयांची इच्छा होती. या रस्त्यावर अनेक अपघात झाले,निधी मात्र मिळत नव्हता आम्ही पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या कानावर या सर्व गोष्टी माजी आ.अमरसिंह पंडित याच्या माध्यमातून घातल्या. त्यामुळे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी पुढाकार घेऊन या रस्त्यासाठी मोठा निधी मंजूर करून दिला,मात्र माजी मंत्र्यांनी आपणच या रस्त्यासाठी ५ कोटींचा निधी मंजूर केला असून त्यासाठी हे काम तातडीने सुरु करा असे निवेदन जिल्हाधिकारी महोदयांना देवून न केलेल्या कामाचे श्रेय घेण्याचा प्रयत्न केला.हे बीडकरांनी लक्षात घ्यावे असे आवाहन नगरसेवक अमर नाईकवाडे यांनी केले.पुढे ते म्हणाले,हा रस्ता लवकर व्हावा यासाठी नगरसेवक विष्णू वाघमारे, बाबुराव दुधाळ व इतरांनी खूप सहकार्य केले. मागच्या २५ वर्षात एका रस्त्यासाठी कोणत्याही नेत्याने जिल्हा नियोजन योजनेतून इतका मोठा निधी दिलेला नाही. म्हणूनच खऱ्या अर्थाने पालकमंत्री मुंडे यांनी लक्ष घातल्यामुळे हा रस्ता आता होत आहे. कोरोना संकट काळात आम्ही सर्व नागरिकांसाठी काम केले,जनतेमध्ये राहून आम्ही काम करतो मात्र काहीजण निवडणूक आली की, न केलेल्या कामांचे श्रेय घेण्याचा खटाटोप करत आहेत मात्र जनतेला सारे काही कळते. मंत्री असताना तुम्ही शहरातील रस्त्यानं यापूर्वी निधी नक्की आणला मात्र ती कामे दर्जेदार करण्यासाठी आम्ही उभे राहून काम केले.आम्ही कधीच विकासकामांसाठी खोडा घातला नाही. त्यामुळे सोन्याचा चमचा तोंडी घेऊन जन्मलेल्याला संधी द्यायची की, सर्वसामान्यातून पुढे आलेल्या जनतेसाठी काम करणाऱ्याला साथ द्यायची हे बीडकरांनी ओळखावे . ४० वर्षात ज्यांनी काही केले नाही त्यांना अजून ५ वर्षासाठी संधी कशाला पाहिजे असा सवालही अमर नाईकवाडे यांनी केला.

---

## डिजिटल मीडिया परिषदेच्या जिल्हाध्यक्षपदी दिनकर शिंदे यांची बिनविरोध निवड

### एस एम देशमुख, बदामराव पंडितांनी केला सत्कार



गेवराई । प्रतिनिधी

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेशी सलग्न असलेल्या डिजिटल मीडिया परिषदेच्या बीड जिल्हाध्यक्षपदी दिनकर शिंदे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. अ भा मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख यांनी ही घोषणा केली तर माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या हस्ते निवडीचे पत्र देऊन सत्कार करण्यात आला. गेवराई येथील शासकीय विश्रामगृह येथे दिनांक ६ ऑक्टोबर २०२४ रविवार रोजी मराठी पत्रकार परिषद, गेवराई तालुका पत्रकार संघ आणि डिजिटल मीडिया परिषदेच्या सर्व पत्रकारांची अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली. यावेळी माजी राज्यमंत्री बदामराव पंडित मराठी पत्रकार परिषदेचे जिल्हाध्यक्ष विशाल सोळुंके, डिजिटल मीडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे, संपादक सर्वोत्तम गावस्कर, राज्य शासन स्वीकृती सदस्य अनिल महाजन, जिल्हा कार्याध्यक्ष दिनकर शिंदे, गेवराई तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष मधुकर तौर, डिजिटल मीडिया परिषदेचे तालुका अध्यक्ष अविनाश इंगावले यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी एस एम देशमुख यांनी उपस्थित पत्रकारांना भविष्यातील पत्रकारिता आणि डिजिटल मीडियाचे महत्व याविषयी सविस्तर माहिती दिली. यावेळी गेल्या २८ वर्षापासून पत्रकारिता क्षेत्रात सक्रियपणे काम करत असलेल्या आणि त्यासोबतच डी एस न्यूज हे युट्युब चॅनेल सुरू करून, सामाजिक, राजकीय आणि चालू घडामोडीवर रोखठोक आणि परखडपणे मत व्यक्त करून राज्यभरात आपली वेगळी ओळख निर्माण केलेल्या पत्रकार दिनकर शिंदे यांची डिजिटल मीडिया परिषदेच्या बीड जिल्हा अध्यक्षपदी निवड केल्याचे जाहीर केले. दिनकर शिंदे यांनी जिल्हा कार्याध्यक्ष असताना यूट्यूब आणि डिजिटल मीडियाच्या माध्यमातून मराठी पत्रकार परिषदेला अपेक्षित असलेले काम योग्य पद्धतीने केल्याचा उल्लेख करून एस एम देशमुख यांनी त्यांचे कौतुक करून त्यांची डिजिटल मीडियाच्या बीड जिल्हा अध्यक्षपदी निवड जाहीर केली. यावेळी बदामराव पंडित म्हणाले की, पत्रकार हा सत्ताधाऱ्यांना आरसा दाखवणारा असतो. काम करणाऱ्याची चूक आणि त्यांनी केलेले चांगले कार्य योग्य पद्धतीने पत्रकार बांधवांनी समाजा समोर मांडणे अत्यंत गरजेचे असल्याची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. एस एम देशमुख आणि माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, डिजिटल मीडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांच्या हस्ते दिनकर शिंदे यांना डिजिटल मीडिया परिषदेच्या बीड जिल्हाध्यक्ष पदावर निवड झाल्याचे पत्र देऊन शाल, श्रीफळ व पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला. याप्रसंगी पत्रकार संघाचे जिल्हा सचिव राजेंद्र बरकसे, जिल्हा उपाध्यक्ष जुनेद बागवान, ज्येष्ठ पत्रकार आयुब बागवान, सुभाष सुतार, गणेश क्षिरसागर, सुभाष शिंदे, सोमनाथ मोटे, संपादक सुनील पोपळे, शेख जावेद, सुशील टकले, इम्रान सौदागर, देवराज कोवळे, गणेश ढाकणे, अमोल भांगे, प्रसाद कुलकर्णी, शेख खाजा, गजानन चौकटे, अफरोज इनामदार, सय्यद रेहान, शेख इर्शाद, नवनाथ काळे, ओम साबळे, या पत्रकारांसह कलाविष्कार प्रतिष्ठानचे एकनाथ लाड, नारायण झेंडेकर, संतोष कोठेकर, गणेश माने, सचिन पुणेकर, अनिल गंगणे आदींसह बीड जिल्ह्यातील मराठी पत्रकार परिषद आणि डिजिटल मीडिया परिषदेचे सदस्य पत्रकार बहुसंख्येने उपस्थित होते.

---

## अडिच महिन्यापासून राष्ट्रीय महामार्गावरील पथदिवे बंद तात्काळ;दुरुस्ती करा

### १० ऑक्टोबर रोजी नगरपंचायतच्या नावाने बोंबा मारो आंदोलन

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते हॉटेल अनिकेत पैठण ते पंढरपूर राष्ट्रीय महामार्गाच्या दुभाजकावरील पथदिवे अडीच महिन्यांपासून बंद असुन नवरात्र, दसरा, दिवाळीच्या पार्श्वभूमीवर तातडीने दुरुस्त करण्यात यावेत यासाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ. गणेश ढवळे लिंबागणेकर, पाटोदा तालुका कार्याध्यक्ष शेख जावेद, पाटोदा तालुका अध्यक्ष हमीदखान पठाण यांच्या नेतृत्वाखाली दि.१०ऑक्टोबर गुरूवार रोजी पाटोदा नगरपंचायत कार्यालयासमोर '' बोंबाबोंब आंदोलन'' करण्यात येणार असल्याचे निवेदन मा.जिल्हाधिकारी बीड,मा. उपविभागीय अधिकारी साहेब पाटोदा,पाटोदा तहसीलदार,मा.पोलीस निरीक्षक पाटोदा यांना दिले आहे दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की,

पाटोदा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते हॉटेल अनिकेत पर्यंत असलेल्या पैठण ते पंढरपूर राष्ट्रीय महामार्गावरील दुभाजकांवरील पथदिवे अडीच महिन्यांपासून बंद असुन यामुळे नागरीकांना अडचणींचा सामना करावा लागत असुन संबंधित विभाग आणि कंपनीशी संपर्क साधला असता देखरेखीसाठी पाटोदा नगरपंचायतला वर्ग करण्यात आले असुन त्यांची जबाबदारी आहे असे सांगितले जाते आणि नगरपंचायत प्रशासनाला वेळोवेळी कल्पना दिली असता उडवाउडवीची उत्तरे देण्यात येत असुन नवरात्र, दसरा दिवाळीच्या पार्श्वभूमीवर तातडीने दुरुस्ती करण्यात यावीत या प्रमुख मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर, माहिती आधिकार कार्यकर्ता पाटोदा तालुका कार्याध्यक्ष शेख जावेद, पाटोदा तालुकाध्यक्ष हमीदखान पठाण यांच्या नेतृत्वाखाली दि.१० ऑक्टोबर गुरुवार रोजी सकाळी साडे ११ वाजता नगरपंचायत कार्यालयासमोर '' बोंबा मारो आंदोलन''करण्यात येणार असल्याचे म्हटलं आहे मागणीचे निवेदन नायब तहसिलदार मा.श्रीनिवास मुळे यांना देण्यात आले. यावेळी तालुकाध्यक्ष हमीदखान पठाण, कार्याध्यक्ष जावेद शेख, मोसिन भाऊ,सामाजिक कार्यकर्ते सतिष उबाळे,पत्रकार प्रतिप उबाळे,शेख जावेद आदी उपस्थित होते.

---

## आ.पवार यांचा तालुक्यात विकास कामांचा धुमधडाका

गेवराई । प्रतिनिधी

आमदार लक्ष्मण पवार यांनी गेवराई तालुक्यात विकास कामाचा धडाका लावला असून अनेक ग्रामीण भागात रस्त्याचे दर्जेदार जाळे तयार करून ग्रामीण भागालाही न्याय देण्याचे काम केले त्यामुळे आमदार पवार यांची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढत चालली आहे.

आ.लक्ष्मण आण्णा पवार यांच्या माध्यमातून गेवराई तालुक्यातील एन एच६१ मंगरूळ रस्ता, जातेगाव मुख्य रस्ता ते माळहिरवा, मादळमोही ते मानमोडी, चकलांबा ते तरटगव्हाण रस्ता, रामा- ६२ ते रसुराबाद रस्ता व चकलांबा ते बाळानाईक तांडा असे एकूण रस्ता सुधार योजना अंतर्गत १७ कोटी रुपये रस्ता कामाचा भव्य उद्घाटन समारंभ दि.७-१०-२४ रोजी गेवराई विधानसभा मतदारसंघाचे



आ.लक्ष्मण आण्णा पवार यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. मागील अनेक वर्षापासून या भागातील नागरिकांची रस्त्याची मागणी होती अत्यंत खराब रस्त्याहून त्यांना गावाकडे ये जा करावे लागत होते परंतु त्यांची ही अडचण आमदार लक्ष्मण पवार यांच्या माध्यमातून आता दूर झाली असून लवकरच त्यांना दर्जेदार रस्ता तयार करण्यात येणार आहे त्यामुळे या भागातील नागरिकांतून आमदार पवार यांचे कौतुक होत असून त्यांची लोकप्रियता वाढली आहे.

---

## कुणाला कुठे रोखायचं एवढी ताकद निश्चित आमच्यामध्ये आहे-दत्ता वाकसे

बीड । प्रतिनिधी

सध्या विधानसभा निवडणुकीचे माजलगाव मतदार संघामध्ये मोठ्या प्रमाणात वारे वाहत आहे अनेक जण गुडघ्याला बाशिंग बांधून. बसलेले आहेत परंतु आम्ही चळवळीमध्ये आणि समाजाच्या विकासासाठी काम करत.असताना निश्चितपणे कोणाला कुठे. रोखायचं एवढी ताकद मात्र निश्चित आमच्या मध्ये आहे असे प्रखर आणि रोखठोक मत शेफर्ड इंडिया इंटरनॅशनल संघटनेचे महाराष्ट्र राज्याचे व्हाईस प्रेसिडेंट दत्ता वाकसे यांनी व्यक्त केले आहे

धनगर समाजातील चळवळीतल्या नेतृत्वाला वेळोवेळी हिनवण्याचं काम काही लोक करत आहेत त्यांना निश्चितपणाने. आम्ही आगामी काळात त्याचे उत्तर विधानसभा निवडणुकीमध्ये दाखवून देऊ धनगर समाजाच्या आरक्षणाच्या. संदर्भामध्ये काम करत असताना आम्ही स्वतःच्या



आयुष्याची राख रांगोळी करून घेतलेली आहे अनेक केसेस आणि गुन्हे दाखल आमच्यावर महाराष्ट्रभर आहेत हा समाज कोणाच्याही भूलथापांना. बळी पडणार नाही धनगर समाजाचे न्यायिक मागणीसाठी आम्ही वेळोवेळी संघर्ष करत आलेलो. आहोत वयाचा तेरा वर्षाचा असताना या समाजाच्या उन्नतीसाठी विकासासाठी काम करत आलेलो आहोत. माजलगाव विधानसभा. मतदारसंघांमध्ये धनगर समाजाच्या व्यथा जाणून घेण्याचं. काम कोणीही करत नाही समाजाचा. फक्त वापर केला जातो त्यामुळे आगामी काळात आम्ही निश्चितपणाने ज्यांना कुणाला जागा दाखवून द्यायचे आहे ते दाखवून देण्याचे काम मताच्या माध्यमातून करू सामाजिक समतोल ठेवून आम्ही स्वतःचे जीवन समाजासाठी समर्पित केलेला आहे समाजाच्या न्यायिक मागणीसाठी मेंढपाळांच्या.हक्कासाठी राज्यभर आम्ही मोठ्या प्रमाणात.जण आंदोलन त आंदोलन केलेली आहेत आणि वेळेला कोणीतरी येऊन. मी समाजाचं काम करतो असं जमणार नाही ओबीसी म्हणून घेणाऱ्या माजलगाव मतदार संघातील काही महायुराजांनी.धनगर समाजाच्या अनेक युवकांना फसवण्याचा काम केलेला आहे त्यामुळे आगामी काळामध्ये कुणाला कुठे रोखायचं एवढी ताकत मात्र आमच्या मध्ये. आहे आणि ती निश्चितपणे आम्ही आगामी विधानसभा निवडणुकीमध्ये दाखवून देऊ असे मत शेफर्ड इंडिया इंटरनॅशनल संघटनेचे महाराष्ट्र राज्याचे व्हॉइस प्रेसिडेंट दत्ता वाकसे यांनी व्यक्त केले आहे

---

## शैलेश आंधळेंची रुई गावातून वाजतगाजत मिरवणूक

वडवणी । प्रतिनिधी

विद्यार्थ्यांनी निश्चय केला आणि आपलं टारगेट ठरवून अभ्यास केला आणि त्याच्यामध्ये सातत्य ठेवत जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर यश निश्चित मिळते. केल्याने होत आहे रे आधी केलेच पाहिजे' या उक्तीप्रमाणे जिद्द व मेहनत असेल तर कोणतेही काम साध्य होते. एक दिवस आई-वडिलांचे स्वप्न साकार करायचे असे म्हणून शैलेश आंधळे याने अभ्यास करुन 'एमपीएससी' परीक्षा उत्तीर्ण करुन राज्यात ४४ व्या क्रमांक पटकावून रुई पिंपळा गावाचे नाव महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात उज्वल केल्याचे मत माजी आ. केशवराव आंधळे यांनी रुई (पिंपळा) येथील स्वागत समारंभ कार्यक्रमाच्या वेळी मत व्यक्त केले.

वडवणी तालुक्यातील डोंगरपट्ट्यातील रुई (पिंपळा) हे छोटं गाव आहे. या गावाची ओळख माजी आ.केशवराव आंधळे यांच्यामुळे महाराष्ट्रात ओळख आहे. याच धर्तीवर शैलेश भिकाराम आंधळे यांनी आठ वर्षे पुणे येथे अभ्यास करून अखेर यशाला गवसणी घातली आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोग स्पर्धा परिक्षेचा निकाल लागला असुन राज्यात ४४ व्या रँकने उत्तीर्ण झाल्याची माहिती कळताच गावाचं नाव मोठं केलं यांच्या आनंदात गावाने ढोल, ताशाचा गजर करत त्याची मिरवणूक काढली. त्यांच्यावर



### संपूर्ण गावाला जेवण

एमपीएससी स्पर्धा परीक्षेत रुई गावाचा अधिकारी झाल्याचा आनंदीत होऊन युवा सरपंच मयूर आंधळे यांनी मोठ्या उत्साहात साजरा करत रथातून वाजतगाजत गावातुन मिरवणूक काढण्यात आली. कार्यक्रमाचे शेवटी संपूर्ण गावाला अन्नदान करत जेवण देऊन आनंदोत्सव साजरा करण्यात आला आहे. ग्रामपंचायतीच्या वतीने असे ''सुस्त उपक्रम'' राबविले गेला आहे. वक्त्यांनी व्यक्त केलेले मनोगत तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत असल्याचे समाधान युवा सरपंच मयूर आंधळे यांनी व्यक्त केले.

फुलांचा वर्षाव केला. महिलांनी औक्षण केलं.गावकऱ्यांनी रुई (पिंपळा) गावातील प्रमुख मार्गाने वाजतगाजत रथामधुन मिरवणूक काढत पेढे वाटण्यात आले आणि पेढेतुला देखील करण्यात आली. शैलेश आंधळे यांचा माजी. आ. केशवराव आंधळे यांच्या हस्ते भव्यदिव्य सत्कार करण्यात आला.पुढे बोलताना माजी. आ. आंधळे म्हणाले की, शैलेश आंधळे यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोग स्पर्धा परीक्षेत आपला डंका वाजवला असून याच प्रमाणे गावातील प्रत्येक विद्यार्थ्यांनी शैलेश आंधळे याच्याप्रमाणे अभ्यास करून आणखी मोठे मोठे अधिकारी रुई गावात घडावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. यावेळी माजी आमदार केशवराव आंधळे, माजी सभापती दिनकर आंधळे, डॉ. मारोती आंधळे, बालकिशन तापडिया, सिने अभिनेते शंकरराव आंधळे,भिकाराम आंधळे, तुकाराम बोदंर,मधूकर धस सर, माजी नगरसेवक सतीश बडे, संचालक रणजीत धस, ॲड.प्रभाकर आंधळे, शिवाजी मुंडे, महादेव सावंत, अशोक मुंडे, गणेश मुंडे, विक्रम बडे, बाळासाहेब मुंडे, सुनील मुंडे, सोनाजी लोंढे, अनिल कुलकर्णी, पांडुरंग धैतिडक, सुधाकर लोंढे, सह आदी उपस्थित होते.या कार्यक्रमाचे आयोजन युवा सरपंच मयूर आंधळे यांनी चोक नियोजन केले होते. गावचा अधिकारी झाल्याचा आनंद व्यक्त करत संपूर्ण गावाला अन्नदान करत जेवण आनंदोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक युवानेते संजय आंधळे यांनी केले तर सूत्रसंचालन विष्णू आंधळे यांनी केले तर आभार प्रदर्शन युवा सरपंच मयूर आंधळे यांनी व्यक्त केले. यावेळी महिला, पुरुष,तरुणासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## आजीवन शिक्षण व विस्तार सेवा कक्षाचे उद्घाटन



पाटोदा । प्रतिनिधी

येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात नुकतेच आजीवन शिक्षण व विस्तार सेवा कक्षाचे उद्घाटन संपन्न झाले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाच्या कला व विज्ञान महाविद्यालयाचे इतिहास विभागप्रमुख डॉ. सोमनाथ घाडगे, उपप्राचार्य प्रो. सतिष माउलगे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात कक्षाचे समन्वयक डॉ. प्रकाश फड यांनी आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभागाचे महत्व विषद करत यामार्फत राबवले जाणारे उपक्रम विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासास कसे उपयुक्त आहेत ते स्पष्ट केले.उद्घाटनपर भाषणात डॉ. सोमनाथ घाडगे यांनी 'व्यक्तिमत्व विकास' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत अंतर्बाह्य व्यक्तिमत्व विकासासाठी सतत अध्ययन, चिंतन, मनन, साधे पण स्वच्छ राहणीमान, इतरांचा आदर करणे, वक्तशीरपणा पाळणे आदि विषयांवर सविस्तर मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन डॉ. अशोक नागरगोजे यांनी केले. आभारप्रदर्शन डॉ दिलीप गिऱ्हे यांनी केले. कार्यक्रमास वरिष्ठ विभागाचे विद्यार्थी व प्राध्यापक बहुसंख्येने उपस्थित होते.

# जिल्ह्यातील ११ प्लास्टीक प्रक्रिया केंद्रांना मंजुरी

## कडा येथे प्लास्टिक प्रक्रीया केंद्राचे सनदी अधिकारी अर्पिता ठुबे यांच्या हस्ते उद्‌घाटन

**बीड । प्रतिनिधी**

घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन या उपक्रमांतर्गत ओला व सुका असे कचरा वर्गीकरण प्रत्येक कुटुंब स्तरावर होण्यासाठी ग्रामस्थांचे वर्तन बदल करण्याचे धोरण निश्चित झाले आहे . त्यात जमा होणारे प्लास्टिक व्यवस्थापन करण्याकरिता प्रत्येक तालुक्यात एक प्लास्टिक प्रक्रिया केंद्र उभारण्याची मंजुरी शासनाकडून मिळालेली आहे. त्याचाच एक भाग म्हणून आष्टी तालुक्यातील कडा ग्रामपंचायतीच्या प्लास्टिक प्रक्रिया केंद्राचे उद्घाटन प्रशिक्षणार्थी सनदी अधिकारी अर्पिता ठूबे यांच्या हस्ते करण्यात आले. या उद्घाटन प्रसंगी सागर धस, उपमुख्य कार्यकारी अधिकारी सुधाकर मुंडे, या उपक्रमाचे समन्वयक संजय मिसाळ, साई इंजिनियर्स यांचे चिन्मय खुटे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

जिल्ह्यात अकरा तालुक्यांमध्ये प्लास्टिक प्रक्रिया केंद्र उभारण्यासाठी राज्याकडून मंजुरी मिळालेली आहे. प्लास्टिक कचरा व्यवस्थापन करण्यासाठी प्रत्येक कुटुंबाकडे निळ्या व हिरव्या रंगाची कचराकुंडी असावी व त्यात कुजणारा व






न कुजणारा कचऱ्याचे वर्गीकरण होण्यासाठी स्वच्छतेचे दोन रंग हा गृहभेट व सर्वेक्षणाचा उपक्रम सध्या सुरू आहे तसेच जमा झालेला कचरा वर्गीकरण करण्यासाठी वर्गीकरण केंद्र उभारण्यात आलेले आहे या ठिकाणी लोखंड, काच ,रबर व प्लास्टिक अशा प्रकारचे वर्गीकरण होणार आहे. जमा झालेला इतर कचरा पुनर्वापरासाठी भंगार मध्ये तर प्लास्टिक हे प्रक्रिया केंद्रात पाठविण्यात येणार आहे.

प्रत्येक गावामध्ये गावातील ग्रामस्थ त्याच्याकडे जुने झालेले सामान खराब झालेल्या वस्तू या फेकून न देतात शक्यतो भंगार मध्ये देतात परंतु ५० मायक्रोन पेक्षा जाडीने कमी असलेल्या कॅरीबॅग प्लास्टिकच्या पिशव्या भंगारवाला घेत नाही त्यामुळे त्या इतरत्र फेकून दिल्या जातात या प्लास्टिकच्या पिशव्या वर्षानुवर्ष झालेली वर पडलेले असतात व त्याचे प्रदूषण सुरू असते त्यामुळे हे प्लास्टिक एकत्र करून त्यावर प्रक्रिया करण्याचे धोरण शासनाने अवलंबले आहे.

हा प्लास्टिक कचरा प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये वर्गीकरण केल्यानंतर प्रक्रिया केंद्रात आणण्यात येणार आहे. घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन प्रक्रिया कचरा वर्गीकरण केंद्र प्रत्येक ग्रामपंचायत मध्ये व गावांमध्ये उभारण्यासाठी स्वच्छ भारत मिशन व पंधरावा वित्त आयोग या उपक्रमात आर्थिक तरतूद करण्यात आलेली असून वर्गीकरण केंद्र बांधणे प्रत्येक ग्रामपंचायतीस बंधनकारक करण्यात आलेले आहे. या कुठेही पडलेल्या या प्लास्टिकच्या पिशव्यांना लागलेली धूळ माती झटकून स्वच्छ करून नंतर बारीक तुकड्यांमध्ये त्याचे रूपांतर करण्यासाठी मशीन उपलब्ध झालेले आहे शिवाय प्रक्रिया झालेले प्लास्टिक कचरा सिमेंट रोड किंवा इतर उद्योगांमध्ये वापरण्याचे नियोजन देखील झालेले आहे. प्लास्टिकच्या रिकाम्या बाटल्या व इतर वस्तू यांना फारशी किंमत नाही कारण वजनाने हलक्या वाहतुकीस महाग आहे परंतु या वस्तू एकत्र दाबून त्याचा छोट्या आकारात किमान २५ किलोचा गठ्ठा केल्यास त्याला चांगले किंमत मिळते याकरिता दाब मशीन रद्द करून दिले आहे. सर्व प्लास्टिक प्रक्रिया केंद्र हे व्यावसायिक स्वरूपात बचत गटांना किंवा एखाद्या संस्थेला चालविण्यासाठी देण्याचे धोरण देखील निश्चित झाले असून ग्रामपंचायतींनी कर्मचाऱ्यांची नियुक्ती केलेली आहे. अशी माहिती विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी सुधाकर मुंडे यांनी दिली आहे. हे प्लास्टिक प्रक्रिया केंद्र कार्यान्वित झाल्यानंतर त्याचे सनियंत्रण करण्याचे तंत्रज्ञान साई इंजिनियर्स यांनी उपलब्ध करून दिले आहे. प्रक्रिया केंद्रावरती येणाऱ्या प्लास्टिक संबंधीची माहिती व मशीन किती वेळ चालले आहेत व त्यामध्ये किती प्लास्टिक भरती प्रक्रिया झाली आहे याची ऑनलाईन माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी व संबंधित सर्व अधिकारी यांच्या मोबाईल वर उपलब्ध होणार आहे . अशा प्रकारचे स नियंत्रण करणारे देशातील पहिले व एकमेव तंत्रज्ञान असल्याचे विपणन अधिकारी चिन्मय खुटे यांनी सांगितले आहे.

### टाकाऊ पासून टिकाऊ

शासनाच्या वतीने प्रत्येक तालुक्यात टाकाऊ प्लास्टिक पासून टिकाऊ प्लास्टिक बनवण्यासाठी एक पायलट प्रोजेक्ट देण्यात येणार आहे. त्याची सुरुवात आष्टी तालुक्यातील कडा येथून झाली असून तालुक्यातील सर्व टाकाऊ प्लास्टिक जमा करून त्यापासून टिकाऊ प्लास्टिक बनवण्यासाठी प्रक्रिया केली जाणार आहे. यामुळे प्लास्टिक प्रदूषणाचा धोका तर टाळणारच आहे. त्याबरोबरच कडा ग्रामपंचायतीला उत्पन्नाचे एक मोठे साधनही होणार आहे. अशा अकरा तालुक्यातील एका गावात हा पायलट प्रोजेक्ट होणार असल्याचे या उपक्रमाचे समन्वयक संजय मिसाळ यांनी सांगितले.



*राष्ट्रवादी भटक्या विमुक्त सेलची कार्यकारणी जाहिर*

## तालुका उपाध्यक्षपदी धनराज गित्ते तर संघटकपदी सतीश कुडगिर यांची नियुक्ती

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या परळी वैजनाथ राष्ट्रवादी भटक्या विमुक्त सेलची उर्वरित कार्यकारणी जाहिर करण्यात आली असून यामध्ये राष्ट्रवादी भटक्या विमुक्त सेलच्या (शरदचंद्र पवार गट) तालुका उपाध्यक्षपदी धनराज गित्ते तर संघटकपदी सतीश कुंडगिर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राजेभाऊ फड यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले आहे. या निवडीचे सर्व स्तरातून



अभिनंदन होत आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट) चे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष आ.जयंतराव पाटील यांच्या मान्यतेने व बीड जिल्हाध्यक्ष आ.संदिप क्षीरसागर यांच्या सूचनेवरून राष्ट्रवादी भटक्या विमुक्त सेलच्या परळी वैजनाथ उर्वरित कार्यकारणी जाहिर करण्यात आली असून तालुका उपाध्यक्षपदी धनराज गित्ते तर संघटकपदी सतीश कुंडगीर यांची

पान ३ वर

## सेवानिवृत्त शिक्षक भगवान वाघमारे यांचे दु:खद निधन

**पिंपळवंडी । प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील रहिवाशी व सेवानिवृत्त शिक्षक भगवान आण्णा वाघमारे यांचे वृद्धापणाने व अल्पशा आजाराने दि.६ ऑक्टोबर २०२४ रविवार रोजी रात्री उपचारादरम्यान खाजगी दवाखान्यात वयाच्या ८२ व्या वर्षी दु:खद निधन झाले.त्यांच्या जाण्याने पिंपळवंडी सह परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. अत्यंत शांत,मनमिळाव स्वभाव व धार्मिक वृत्ती यामुळे ते सर्व



परिचित होते ते जुन्या पिढीतील शिक्षक असल्यामुळे शिक्षकांची नोकरी अगदी शिरूर तालुक्यातील दुर्गम वाडी- खेड्यात आदी ठिकाणी इमानदारीने केली.त्यांच्या पार्थिवावर बीड-नगर रोड लगत नदीकाठी असलेल्या स्मशानभूमीत सोमवार रोजी सकाळी ११ वा.शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.यावेळी जि.प.सदस्यपती माऊली आप्पा जरांगे तसेच आजी-माजी सरपंच, उपसरपंच,ग्रामपंचायत सदस्य,

पान ३ वर

## 'उमेद' च्या कर्मचाऱ्यांचे पाच दिवसापासून काम बंद आंदोलन सुरुच

**बीड । प्रतिनिधी**

उमेदला स्वतंत्र कायमस्वरुपी विभाग म्हणुन मान्यता द्यावी तसेच या विभागातील कर्मचाऱ्यांना कायम करावे या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य महिला व कर्मचारी,संघटना बीड जिल्ह्याच्यावतीने जिल्हा परिषद बीड येथे बेमुदत काम बंद आंदोलन ५ दिवसापासून सुरु आहे.


या अभियानाअंतर्गत ८४ लाख ग्रामीण कुटुंबांच्या उज्वल भवितव्यासाठी शासनाच्या ग्रामविकास व पंचायत राज विभागांतर्गत 'उमेद ' महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानास स्वतंत्र कायमस्वरूपी विभाग म्हणून आस्थापनेला मान्यता, अभियाना अंतर्गत कंत्राटी कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांना शासन सेवेत कायम करून घेण्यात यावे यासाठी मागणी केली आहे. या आंदोलनात जिल्हा कोशाध्यक्ष जीवन धापसे, पदाधिकारी मुरहरी सावंत, श्रीमती आशा पवार, गोकुळ नागरगोजे, युवराज गारदे, विठ्ठल ,चव्हाण , श्रीमती प्रीतम भोंडवे, शैलेश चौधरी, विजयकुमार वैष्णव, राजेश आदमे, राहुल वाघमारे, कैलाश कांबळे यांची उपस्थिती आहे. सोमवारी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड व प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा बीड यांना दिनांक ९ ऑक्टोबर २०२४ रोजी होणाऱ्या राष्ट्रीय अधिवेशनाचे निमंत्रण देण्यात आले आहे.




## शेतकऱ्यांसाठी आनंदाची बातमी; माजलगाव धरणाची पाणीपातळी ७५.५१ टक्के

**ज्योतिराम पांढरपोटे**
**माजलगाव**

पावसाचा शेवटचा टप्पा आला तरी माजलगाव धरण मृत साठ्यातच होते.त्यामुळे शहरवासीयांना भेडसावणाऱ्या पाणी प्रश्नाची माजलगावकरांना मोठी चिंता लागून होती.परंतु दि ०१ सप्टेंबर रोजी धरण परिक्षेत्रात झालेल्या सततधांर पावसामुळे व जायकवाडीतून सुरू असलेल्या पाण्याची आवकमुळे माजलगाव धरण एकाच दिवसात मृत साठ्यातून उपयुक्त साठ्यात आले होते. दरम्यान आतापर्यंत झालेल्या पावसामुळे दि ०७ ऑक्टोबर सोमवार रोजी सकाळी ६:०० वाजेपर्यंत



### शेतकऱ्यांचा सिंचनाचा व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी मिटणार

### धरणात पाण्याची १.१६२ ३ आवक सुरू

माजलगाव धरण ७५.५१ % टक्के एवढे भरले असुन धरणात पाण्याची आवक १.१६२/ २९४.३०८ ३ ने सुरूच असून बीड माजलगाव शहरासह १८ खेडी पाणीपुरवठ्याच्या भेडसावणारा पाणी प्रश्न आता कायमस्वरूपी मिटवणार आहे तसेच शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाण्याची सोय होणार असल्याने ही सुखद आणखी आनंदाची बाब आहे.

### यावर्षी नोव्हेंबरमध्ये ऊस लागवडी क्षेत्र वाढणार

गेल्या वर्षी माजलगाव धरण न भरल्यामुळे तालुक्यातील ऊस लागवडीचे क्षेत्र घटल्याने यावर्षीचा साखर कारखान्याचा गळीत हंगाम अडचणीत आला आहे.परंतु यावर्षी उशिराने का होईना माजलगाव धरण ७५% टक्के भरल्यामुळे शेतकऱ्यांचा सिंचनाचा प्रश्न मिटल्या ने यावर्षी तालुक्यात नोव्हेंबर पासुन शेतकऱ्यांचा ऊस लागवडीकडे कल वाढल्याने ऊस लागवडीचे क्षेत्र वाढणार आहे.

### माजलगाव धरणाची दि ०७ ऑक्टोबर सोमवार रोजी सकाळी ६:०० वाजेपर्यंतची स्थिती

१) धरणाची एकुण पाणीपातळी -४३०.७७ मी/४३१.८० मी.
२) धरणातील एकूण पाणीसाठा -३७७.६० ३/४५४ ३.
३) उपयुक्त पाणीसाठा:- २३५.६० ३/३१२.०० ३
४) धरणाची टक्केवारी- ७५.५१ %
५) धरणात येणारी पाण्याची आवक:-१.१६२/२९४.३०८ ३

बीड माजलगाव शहरासह १८ खेड्यांची ताहान भागवणारे माजलगाव धरण पावसाळा संपत आला तरी कोरडे ठाकच होते. धुंवाधार नक्षत्र असणाऱ्या मौसमी पावसातल्या ऑगस्ट अखेर धरणाची पाणी पातळी ही मृत साठ्यातच होती. माजलगावकरांसाठी हि मोठी चिंतेची बाब होती. नागरिकांच्या पिण्याच्या पाण्यासह,जनावरे, शेतीला लागणाऱ्या सिंचनाची/ पाण्याची मोठी समस्या उभी राहणार होती.परंतु दि १ सप्टेबंर रोजी पासुन वरुण राजाने राज्यात खास करून मराठवाड्यात धुवाधार बॅटिंग करण्यास सुरुवात

पान ३ वर

## मतदार जनजागृती रॅलीसाठी तालुक्यातील शाळांनी सहभाग घ्यावा- गटशिक्षणाधिकारी यादव

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

आगामी काळात विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी मतदार जनजागृती अभियानांतर्गत मतदार जनजागृती रॅलीसाठी बहुसंख्येने आष्टी शहरातील उच्च प्राथमिक व माध्यमिक उच्च माध्यमिक शाळानी मतदार जनजागृती निमित्त आज दि.८ ऑक्टोबर रोजी सकाळी ९.०० वाजता रॅलीचे आयोजन करण्यात आले असून या शाळेने पंचायत समिती प्रांगणामध्ये उपस्थित रहावे असे आवाहन पंचायत समिती आष्टीचे स्वीप नोडल ऑफिसर तथा गटशिक्षणाधिकारी सुधाकर यादव यांनी केले आहे. आष्टी येथील पंचायत समिती प्रांगणामध्ये सर्व शाळांनी एकत्र येऊन शहरात रॅलीच्याद्वारे जनजागृती करावी तसेच गाव पातळीवर शाळेनी रॅलीच्याद्वारे जनजागृती करावी असे त्यांनी पुढे बोलताना सांगितले.

तालुक्यातील सर्व शाळांनी आपल्या विद्यार्थ्यांना रॅलीच्याद्वारे जनजागृती करून मतदारांना मतदानाबाबत संदेश द्यावा यासाठी बॅनर, फलकदर्शक आदी चा वापर करून जनजागृती करावी असे त्यांनी यावेळी सांगितले. शालेय विद्यार्थिनी खालील

पान ३ वर

## दोषींना शिक्षा हवी, पण निर्दोष लोकांना त्रास नकोच-खुर्शीद आलम

**बीड । प्रतिनिधी**

गेल्या चार ऑक्टोबर रोजी बीडच्या हॉटेल गोल्डन चॉईस मध्ये हिंदू मुस्लिम चे दोन जोडपे हॉटेलमध्ये चावटपणा करत आहेत अशी अफवा बीड शहरात पसरली, विशेष म्हणजे हॉटेल गोल्डन चॉईस च्या थोड्याच अंतरावर असलेल्या मस्जिदीमध्ये शुक्रवारची नमाज संपल्यानंतर लोकांना माहिती कळताच अचानकपणे हॉटेल गोल्डन चॉईस समोर बघ्यांची गर्दी जमा झाली, पोलिसांनी प्रेमी जोडप्यांना ताब्यात घेऊन पोलीस व्हॅन मध्ये बसवले पण



अप्पर पोलिस अधीक्षकांची मुखीद लाला,लक्ष्मण इटकर,मतीन भाई,अय्युब खान यांनी घेतली भेट

जमलेल्या जमाव मधल्या काही टवाळखोरांनी आरडाओरडा करत हुल्लडबाजानी पोलिसांच्या गाडीतून जोडप्यांना बाहेर काढण्याचा प्रयत्न केला त्यामुळे पोलिस आणि टवाळखोरामध्ये बाचाबाचीचे प्रकरण झाले, ज्या लोकांनी जाणुनबुजून प्रकरण वाढविण्याचा प्रयत्न केले त्यांच्यावर कायदेशीर कारवाई केली तर हरकत नाही पण इतर अनेकांवर कारेवाई होणे चुकीचेच आहे कारण तेथे जमलेल्या जमाव मधल्या काही लोक त्याच हॉटेल मध्ये जेवणासाठी चहा पाणीसाठी आलेले होते तर काही लोक रस्त्यावर गर्दी कशासाठी जमली म्हणून थांबलेले होते म्हणून ते सि.सि. कॅमेऱ्यामध्ये आणि मोबाईल विडीओ मध्ये कैद झालेले आहेत, तेच विडीओला पुरावा म्हणून पोलिस वापरत आहेत म्हणून पोलिसांना विनंती आहे की जे दोशी असेल आम्ही त्यांची बाजू अजिबात घेणार नाहीत पण फक्त विडीओ मध्ये दिसत

पान ३ वर

## बनसारोळा येथे सालगड्यास दगडाने मारहाण

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील बनसारोळा येथील ज्ञानेश्वर सूर्यकांत सुवर्णकार वय ४० हे शेतकरी रामेश्वर श्रीनिवास रांदड यांच्या शेतात सालगडी म्हणून दहा वर्षापासून आहेत. त्यांनी १ ऑक्टोबर रोजी शेतमालकाच्या शेतातील ठिबकच्या नळ्या चेक करत असताना पाणी सोडले म्हणून दत्तात्रय बालासाहेब काकडे , श्रीकांत बालासाहेब काकडे या दोघा भावांनी येऊन 'तू रस्त्यावर पाणी का सोडले.? असे म्हणत बेदम मारहाण करीत सुवर्णकार यांना जखमी केले. भांडण सोडवण्यास आलेल्या त्यांची पत्नी सारिका सुवर्णकार यांनाही ढकलून दिले. याप्रकरणी वडगाव पोलीस चौकीत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेचा तपास पोलीस कॉ तोंडे हे करत आहेत.






This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
मंगळवार, दि.८ ऑक्टोबर २०२४ | पान ७

# पुण्यातील बोपदेव घाट प्रकरणी पोलीस फास्ट ॲक्शन मोडवर!

## आधी १० लाखांचं बक्षीस, आता 'सिंबा'ची मदत

**पुणे । प्रतिनिधी**

येथील बोपदेव घाटात गुरुवारी आपल्या मित्रासोबत फिरायला गेलेल्या तरुणीवर तीन जणांनी बलात्कार केल्याची घटना घडली. या घटनेमुळे राज्यभरात संताप व्यक्त केला जात आहे. ही घटना समोर आल्यानंतर पोलिसांनी घटनेचा सखोल तपास सुरू केला असून पोलिसांनी आतापर्यंत २०० हून अधिक संशयित व्यक्तींची कसून चौकशी केली आहे. आता बोपदेव घाट अत्याचार प्रकरणी आरोपींचा शोध घेण्यासाठी सिंबाची मदत घेण्यात येणार आहे.



बोपदेव घाट सामूहिक बलात्कार प्रकरणातील आरोपींना पकडण्यासाठी राज्य सरकार आणि गृह मंत्रालयाने मोठे पाऊल उचलले आहे. आरोपींची माहिती देणाऱ्या व्यक्तीला १० लाख रुपयांचे बक्षीस देण्याची घोषणा पोलीस खात्याकडून करण्यात आली आहे. आरोपींची नावे आणि ठावठिकाणा सांगणाऱ्या व्यक्तीची ओळखही गुप्त ठेवली जाईल, असे आश्वासनही पोलिसांनी दिले आहे. यानंतर आता बोपदेव घाट अत्याचार प्रकरणी आरोपींचा शोध घेण्यासाठी सिस्टीम फॉर इंटेलिजंट मॉनिटरिंग बिहेवियरियल एनालिसिस या एआय तंत्रज्ञानाची मदत घेतली जाणार आहे. एआय मॉडेलची मदत घेऊन माहिती संकलित केली जाणार आहे. रात्रीची वेळ असल्याने सीसीटीव्हीत स्पष्ट दिसत नसल्याने संशयित आरोपींचे चेहरे पाहण्यासाठी हे तंत्रज्ञान वापरले जाणार आहे. सिम्बाचा मुख्य घटक, क्राइम ऋख्ढ म्हणून ओळखला जातो. तो व्हिडिओ, इमेज आणि ऑडिओमधून माहिती काढण्यासाठी विस्तृत डेटाबेस वापरतो. सिंबा हे तंत्रज्ञान १.५ लाख गुन्हेगारी नोंदी असलेल्या डिजिटल डेटाबेसशी जोडले गेले आहे.

पीडित तरुणी पुण्यातील बोपदेव घाटात गुरुवारी रात्री आपल्या मित्रासोबत फिरायला गेली होती. यावेळी तीन जणांनी या दोघांवर हल्ला केला. हल्लेखोरांनी तरुणी आणि तिच्या मित्राला कोयत्याचा धाक दाखवला. आरोपींनी तरुणाला मारहाण करून त्याचा शर्ट काढला आणि त्याच शर्टने आरोपींनी तरुणाचे हात बांधले. त्याच्याच पॅन्टचा पट्टा काढून त्याचे पाय देखील बांधले. त्यानंतर आरोपींनी तरुणाला एका झाडाला बांधून ठेवले. त्यांनतर २१ वर्षीय तरुणीवर आळीपाळीने बलात्कार केला. ही घटना समोर आल्यानंतर पोलिसांनी घटनेचा सखोल तपास सुरू केला आहे. नराधम आरोपींकडे कोयता, चाकू अशी शस्त्रे होती, तसेच एका आरोपीच्या हातात बांबू होता. मित्राला ठार मारण्याची धमकी देऊन आरोपींनी तरुणीवर सामूहिक बलात्कार केल्याची माहिती समोर येत आहे.

# प्रत्येक जिल्ह्यात संविधान भवन उभारणार : किरेन रिजिजू

पुणे : अल्पसंख्याक समाजातील गैरसमज दूर करण्यासाठी मी महाराष्ट्रात आलो आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात संविधान भवन बांधले जाणार आहे. त्यासाठी केंद्र व राज्य सरकारकडून निधी मिळणार आहे. त्यामध्ये वसतीगृह, ग्रंथालय, कौशल्य विकास केंद्र, क्रीडांगण आदीचा समावेश असणार आहे, अशी माहिती केंद्रीय अल्पसंख्याक मंत्री किरेन रिजिजू यांनी (दि.७) पत्रकार परिषदेत दिली.



याबाबत बोलताना रिजिजु म्हणाले, परदेशात जाऊन राहुल देश विरोधी शक्तींच्या मदतीने कार्यक्रम घेत आहेत आणि भारतात अल्पसंख्याक, दलित सुरक्षित नाहीत. त्यांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणली आहे, असे खोटे सांगून देशाची बदनामी करत आहेत. महाराष्ट्रातही संविधान धोक्यात आहे, असा खोटा प्रचार केला जात असल्याचा आरोपही त्यांनी यावेळी केला.

मुस्लिम समाजाबाबत बोलताना रिजिजु म्हणाले, मुस्लीम समुदायाला आम्ही वेगळी वागणूक दिलेली नाही. पण त्यांनी मत दिले तर आमची सत्ता येईल, त्यानंतरच त्यांना सत्तेत वाटा दिला जाईल. मत दिले नाही तर संधी कशी मिळणार? आगामी विधानसभा निवडणुकांच्या दृष्टिकोनातून भाजपकडून महाराष्ट्रात मोर्चेबांधणी सुरु करण्यात आली आहे. लोकसभा निवडणुकीत संविधान बदलाचा जो नेरेटिव्ह सेट करण्यात आला होता. त्याचा फटका लोकसभा निवडणुकीत बसला आहे, तो आगामी विधानसभा निवडणुकीत बसू नये, म्हणून भाजपकडून केंद्रीय पातळीवर प्रयत्न केले जात आहेत.वक्फ बोर्ड सुधारणा विधेयकामुळे मुस्लिमांची जमीन काढून घेतली जाणार, मशीद पाडली जाणार, असे खोटे पसरविले जात आहे. असा कोणताही प्रकार होणार नाही. मुस्लिम समाजाची जनजागृती करण्याचे काम करत आहेत. जे संविधान हातात पकडून फिरत आहेत. त्यांनीच संविधान, लोकशाहीची हत्या केली होती. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना संसदेत येण्यापासून रोखले, मंत्रिमंडळातही घेतले नव्हते, पंडित नेहरूंनी त्यांचा वारंवार अपमान केला. हेच लोक आता भाजपकडून संविधान धोक्यात आहे, असे सांगून मुस्लिमांचा वोट बँक म्हणून वापर करत आहेत. पण दरवेळी हा समाज काँग्रेसच्या खोट्या प्रचाराला बळी पडणार नाही, असेही रिजिजू म्हणाले.

# दौंडचा कत्तलखाना बंद न झाल्यास उग्र आंदोलन

दौंड - दौंड नगरपालिकेने भीमा नदीकाठी उभारलेला कत्तलखाना रद्द झाला नाही तर उग्र आंदोलन केले जाईल, असा थेट इशारा सराला बेट (जि. नगर) येथील सदगुरू गंगागिरी महाराज संस्थानचे मठाधिपती रामगिरी महाराज यांनी दिला आहे.




पुणे जिल्ह्यातील दौंड नगरपालिकेने २ कोटी ३२ लाख रूपयांचा निधी खर्च करून शहरातील खाटीक गल्ली मध्ये उभारलेला कत्तलखाना जमीनदोस्त करण्याच्या मागणीसाठी हभप शिरीष महाराज मोरे यांच्या नेतृत्वाखाली मोर्चा काढण्यात आला. मोर्चा नंतर झालेल्या सभेस मठाधिपती रामगिरी महाराज यांनी संबोधित केले. हभप शिरीष महाराज मोरे, शिवसेना धर्मवीर अध्यात्मिक सेनेचे प्रदेशाध्यक्ष हभप अक्षय महाराज भोसले यांच्यासह हभप काका महाराज पाहणे व रमेश महाराज भोसले या वेळी मंचावर उपस्थित होते.

मठाधिपती रामगिरी महाराज म्हणाले, गोवंशहत्या बंदी कायदा असताना सुरू असलेली गोहत्या बंद झाली पाहिजे. कत्तल सुरू राहिली तर देशी गोवंश उरणार नाही. मध्यंतरी महिलांवर अत्याचार करण्याची प्रेरणा देणाऱ्यासंबंधी मी केलेल्या विधानास वादग्रस्त ठरवून मला लक्ष्य करण्यात आले. जीवे मारण्याची धमकी देण्यात आली. परंतु, मी साधू आहे आणि माझे जीवन धर्माला समर्पित आहे. अत्याचार करणारा दोषी तर आहेच पण सहन करणाराही दोषी ठरतो, म्हणून अत्याचार सहन करू नका. हभप शिरीष महाराज मोरे म्हणाले, शासनाने गोमातेला राज्यमातेचा दर्जा दिला ते अभिनंदनीय आहे. परंतु गोमातेची जेथे कत्तल होणार आहे असे कत्तलखाने रद्द केले जात नाहीत. दौंड मधील कत्तलखान्याच्या इमारतीत व्यायामशाळा, रूग्णालय, सांस्कृतिक सभागृह सुरू करावे. महिन्याभरात कत्तलखाना रद्द झाल्याचा शासन निर्णय द्यावा, अन्यथा आम्ही तो जमीनदोस्त करू. सकल हिंदू समाज व वारकरी संप्रदाय यांच्या वतीने दौंड मध्यवर्ती प्रशासकीय इमारत ते छत्रपती शिवाजी महाराज चौक दरम्यान भव्य मोर्चा काढण्यात आला. नायब तहसीलदार शरद भोंग यांनी मागण्यांचे निवेदन स्वीकारले.

# पुणे शहर सुंदर राहण्यामागे स्वच्छता कर्मचार्यांचे मोठे योगदान-संदीप कदम

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे शहर स्वच्छ ठेवण्याचे महत्त्वपूर्ण काम कष्टकरी महिला वर्गाकडून करण्यात येते. शहर स्वच्छ व सुंदर राहण्यामध्ये स्वच्छता कर्मचार्यांचे मोठे योगदान असल्याचे प्रतिपादन पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा विभागाचे प्रमुख संदीप कदम यांनी केले. तसेच झोपडपट्टी असो वा उच्चभ्रू सोसायटी कोणी पैसे दिले नाही म्हणून कचरा घ्यायचा नाही, असे कर्मचार्यांनी करू नये. त्यांचा कचरा घेतल्यास नंतर त्यांना तुमच्या कष्टाची जाणीव होईल. व ते पैसे देण्यास सुरूवात करतील. त्यामुळे तुमची सेवा अखंडीत राहील, असेही कदम यांनी स्पष्ट केले.



श्री महालक्ष्मी मंदिर, श्री बन्सीलाल रामनाथ अग्रवाल धार्मिक व सांस्कृतिक ट्रस्टच्या वतीने आयोजित सार्वजनिक नवरात्र उत्सवात पुणे महानगरपालिकेतील स्वच्छ फाउंडेशनच्या ५१ महिला स्वच्छता कर्मचार्यांचा सन्मान सोहळा पार पडला. यावेळी महापालिकेतील सफाई कर्मचार्यांच्या सन्मानासह त्यांच्या हस्ते देवीची महाआरती करण्यात आली. यावेळी ट्रस्टचे प्रमुख संस्थापक विश्वस्त राजकुमार अग्रवाल, प्रमुख विश्वस्त अमिता अग्रवाल, विश्वस्त ॲड. प्रताप परदेशी, भरत अग्रवाल, डॉ. तृप्ती अग्रवाल, प्रवीण चोरबेले, हेमंत अर्नाळकर आदी उपस्थित होते. धार्मिक कार्यक्रमांसोबतच सांस्कृतिक, सामाजिक उपक्रम देखील यावेळी उत्साहात आयोजित करण्यात आले. यावेळी महिला कर्मचार्यांनी मनोगतही व्यक्त केले.

# मनोज जरांगे यांना सहकार्य करणार्यांचा हिशोब चुकता करणार

### ओबीसी वेलफेअर फाउंडेशनने विधानसभा निवडणुकीतील इच्छुक उमेदवारांना इशारा दिला आहे.

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यातील सर्वच प्रस्थापित पक्षांनी ओबीसी समाजाला उमेदवारी दिल्या नाही, तर त्यांच्या पक्षाचे उमेदवार विधानसभेला पाडले जातील. त्याचबरोबर मनोज जरांगे यांच्या आंदोलनाला सहकार्य करणार्या उमेदवारांचाही या निवडणुकीत ओबीसी समाज हिशोब करेल, असा इशारा ओबीसी वेलफेअर फाउंडेशनचे अध्यक्ष ॲड. मंगेश ससाणे, सेक्रेटरी कमलाकर दरोडे आणि मृणाल ढोले पाटील यांनी (दि. ७) पत्रकार परिषदेत दिला.

ससाणे म्हणाले की, मराठा आरक्षणासाठी नियुक्त केलेल्या माजी न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्या समितीचा दुसरा आणि तिसरा अहवाल सरकारने स्वीकारला आहे. मराठा समाजाच्या नोंदी शोधण्यासाठी या समितीची नियुक्ती सरकारने केली होती. शिंदे समितीने आपला पहिला अहवाल १८ डिसेंबर २०२३ रोजी सरकारकडे सुपूर्द केला होता. त्या नोंदीच्या आधारावर राज्य सरकारने मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याचा निर्णय घेतला होता.



परंतु, आणखी नोंदी शोधण्यासाठी सरकारने समितीला मुदतवाढ दिली होती. वास्तविक ही समिती जातीय दंगली साठी, किंवा सामूहिक अत्याचार सारख्या घटनेची चौकशी करणारी समिती असून अहवाल लपवून ठेवला (जइउ जप चरपेक्ष गरीरपसश) आहे.

मराठा आरक्षणाबाबत मनोज जरांगे यांनी जे आंदोलन उभे केले आहे. त्यांना ज्यांनी ज्यांनी सहकार्य केले आहे. त्यांचा हिशोब ओबीसी समाज येणार्या विधानसभा निवडणुकीत नक्कीच करेल, असा इशारा ढोले - पाटील यांनी यावेळी दिला.

# ओंकारेश्वर मंदिरात चोरी; दानपेटी फोडून चोरट्यांनी लंपास केली रोकड

**पुणे । प्रतिनिधी**

ओंकारेश्वर मंदिरातील दानपेटी फोडून चोरट्यांनी सहा हजार रुपयांची रोकड चोरून नेल्याची घटना उघडकीस आली. याप्रकरणी विश्रामबाग पोलीस ठाण्या चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत कौस्तुभ उल्हास गाडे ( ४०, रा. ओंकारेश्वर मंदिर, शनिवार पेठ) यांनी विश्रामबाग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. ओंकारेश्वर मंदिरात शनिवारी मध्यरात्री शिरलेल्या चोरट्याने गाभाऱ्यातील दानपेटीचे कुलूप तोडून सहा हजार रुपये चोरुन नेले.

रविवारी सकाळी ही घटना उघडकीस आली. त्यानंतर गाडे यांनी पोलिसांकडे तक्रार दिली. या घटनेची माहिती मिळताच गुन्हे शाखेतील पोलीस निरीक्षक अरुण घोडके यांनी घटनास्थळी भेट दिली. पोलिसांनी मंदिराच्या आवारातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांनी केलेले चित्रीकरण तपासासाठी ताब्यात घेतले असून, चोरट्याचा माग काढण्यात येत आहे. या प्रकरणाचा पोलीस उपनिरीक्षक पाटील तपास करत आहेत.

# सिनेस्टाईल पाठलाग करुन आरोपीला केले जेरबंद

**वालचंदनगर । प्रतिनिधी**

सणसर (ता. इंदापूर) येथे वालचंदनगर पोलिसांनी पळून जाणाऱ्या आरोपीचा सिनेस्टाईल पाठलाग करुन अटक केली.



वालचंदनगर पोलिस ठाण्यामध्ये १७ ऑगस्ट २०२४ रोजी मारामारी व ॲट्रासिटीतर्गत दिपक मारुती माने, (वय-२६, रा. सणसर) याच्यावर गुन्हा दाखल झाला होता. तेव्हापासुन तो पोलिसांना सापडत नव्हता. सोमवार (ता. ७) रोजी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास सणसर ग्रामपंचायत कार्यालयाच्या जवळील बाजार तळावरती बसला असल्याची माहिती वालचंदनगर पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक राजकुमार डुणगे यांना मिळाल्यानंतर त्यांनी तातडीने माने याला पकडण्यासाठी पथक पाठवले. यावेळी पोलिस आल्याचे दिसतातच माने हा सणसरच्या ओढ्याच्या पुलावरुन पळून जात असताना पाण्यामध्ये उडी मारली. वालचंदनगर पोलीस ठाण्याचे पोलिस हवालदार शैलेश स्वामी, अजित थोरात, गुलाब पाटील, यांनी सिनेस्टाईल पाठलाग करुन ओढ्यामध्ये उड्या मारुन माने याला ताब्यात घेतले. माने याला पोलिसांनी अटक केली असून आज उद्या न्यायालयामध्ये हजर करण्यात येणार आहे.

# हर्षवर्धन पाटलांच्या प्रवेशाने अडचणी वाढल्या; तिसरा पर्याय देण्याच्या हालचाली, त्याच जागी मेळावा

**बारामती । प्रतिनिधी**

भाजपमधून शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये आलेल्या हर्षवर्धन पाटील (क्ष्रीहीींवहरप झरींळश्र) यांचा पक्षप्रवेश शरद पवारांसाठी डोकेदु:खी ठरण्याची शक्यता आहे. कारण, हर्षवर्धन पाटील यांच्या पक्षप्रवेशाला राष्ट्रवादीतील इंदापूरच्या काही नेत्यांनी स्पष्ट विरोध केला असून आता इंदापूरमध्ये ज्याजागी शरद पवारांच्या उपस्थितीत हर्षवर्धन पाटील यांचा पक्षप्रवेश झाला, त्याच जागेवर मेळाव्याचं आयोजन करण्यात आलं आहे. हर्षवर्धन पाटील यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष (छउझ) प्रवेशानंतर प्रवीण माने, आप्पासाहेब जगदाळे, भरत शहा हे नाराज झाले असून या तिघांनी संयुक्त पत्रकार परिषद घेत पुढील भूमिका स्पष्ट केली. तसेच, हर्षवर्धन पाटील यांच्या उमेदवारीला आव्हान उभं केलं असून इंदापुरात तिसरा पर्याय देण्याचा निर्णय घेण्याच्या तयारीत आहेत. त्यामुळे, या पक्षप्रवेशामुळे शरद पवारांच्या अडचणी वाढणार असल्याचे दिसून येते.



पक्षात मी आणि आप्पासाहेब जगदाळेंसह अनेकजण आगामी विधानसभा निवडणुकांसाठी इच्छुक होतो. याबाबत, आम्ही साहेबांना देखील सांगितले होते की जे पक्षात आहेत त्यांना उमेदवारी द्या. मात्र, आज इंदापूरमध्ये हर्षवर्धन पाटील यांचा पक्षप्रवेश झाला, त्यांची उमेदवारी देखील जाहीर झाली. त्यामुळे, कार्यकर्त्यांनी एकत्र बसून निर्णय घेतला पाहिजे, तिसरी आघाडी पर्याय द्यावा अशी कार्यकर्त्यांची मागणी आहे. लोकांना तिसरा पर्याय दिला पाहिजे, त्यामुळे आम्ही जनतेच्या कोर्टात जाणार असल्याचं पक्षातील इतर प्रमुख नेत्यांनी म्हटलं आहे. विशेष म्हणजे प्रवीण माने यांनी कार्यकर्त्यांसह ११ तारखेला मेळावा घेणार असल्याचं जाहीर केलं आहे. विशेष म्हणजे, ज्या ठिकाणी हर्षवर्धन पाटील यांच्या पक्षप्रवेशाचा कार्यक्रम झाला, तिथेच ११ ऑक्टोबर रोजी मेळावा होईल, असेही माने यांनी सांगितले.

# माता-पित्याच्या ऋणात राहण्यातच खरा आनंद : उद्योजक विठ्ठल मणियार

**पुणे । प्रतिनिधी**

आई वडिलांचे संस्कार, त्याग, समर्पण यातून आपली जडणघडण होते. समाजाचाही त्यात वाटा असतो. पण माता-पित्याचे ऋण आपण कधीही फेडू शकत नाही. त्यांच्या ऋणात राहण्यातच खरा आनंद आहे. आपल्या मातापित्याचा समाजाचा विसर पडू न देता चांगले कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करण्याचा सुषमा व संजय चोरडिया यांनी घेतेलेला वसा कौतुकास्पद आहे, असे मत प्रसिद्ध उद्योजक व सामाजिक कार्यकर्ते विठ्ठलशेठ मणियार यांनी केले.




सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशन संचालित बन्सी-रत्न वेल्फेअर ट्रस्टतर्फे रतनबाई व बन्सीलाल चोरडिया यांच्या स्मरणार्थ दिल्या जाणाऱ्या राष्ट्रीय पुरस्कारांचे वितरण रविवारी करण्यात आले. ॲड. एस. के जैन व कुटुंबियांना पहिला 'बन्सी-रत्न आदर्श परिवार राष्ट्रीय पुरस्कार', तर आशाबाई व रमणलाल लुंकड दाम्पत्यास 'बन्सी-रत्न आदर्श माता-पिता राष्ट्रीय पुरस्कार' प्रदान करण्यात आला. शोभा धारिवाल यांना 'समाजरत्न', पोपटलाल ओस्तवाल यांना 'समाज शिरोमणी', सुभाष ललवाणी यांना 'समाजभूषण', माणिक दुग्गड यांना 'गुरुसेवा' व शेखर मुंदडा यांना 'मानवसेवा' राष्ट्रीय पुरस्कार-२०२४ प्रदान करण्यात आला. पुरस्काराचे हे सातवे वर्ष होते. मानपत्र, सन्मानचिन्ह आणि उपरणे असे या पुरस्काराचे स्वरूप होते. यावेळी जैन समाजातील दहावी व बारावीमधील गुणवंत विद्यार्थ्यांना गुणवत्तेचे प्रमाणपत्र, सुवर्णपदक व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.बिबवेवाडी येथील श्री वर्धमान श्वेतांबर स्थानकावासी जैन श्रावक संघामध्ये झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आचार्य डॉ. लोकेश मुनीजी होते. प्रसिद्ध उद्योजक व सामाजिक कार्यकर्ते विठ्ठलशेठ मणियार, माजी हवाईदल प्रमुख एअरमार्शल भूषण गोखले, संगीतकार अबू मलिक, ब्रह्मकुमारीजचे बी. के. दशरथ भाई, बन्सी-रत्न चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया व उपाध्यक्ष सुषमा चोरडिया, सहयोगी उपाध्यक्षा स्नेहल नवलखा, डॉ. किमया गांधी, मुख्य विकास अधिकारी सिद्धांत चोरडिया, मुख्य कार्यपालन अधिकारी अक्षित कुशल, संचालक प्रशांत पितालिया, प्राचार्य अजित शिंदे आदी उपस्थित होते.